# प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा पत्रसंग्रह



अभय सुरेश लाम्हाणे
भरूच (09898088386)

# प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर
# यांचा
# पत्रसंग्रह

**सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन**

प्रकाशन दिवस
**गुरुपौर्णिमा**
२९ जुलै २००७

मुद्रक
**ग्राफिक प्रिंटर्स**
वझिरा नाका, बोरिवली (पश्चिम),
मुंबई - ४०० ०९१.
दूरध्वनी क्र. २८९९ ९३३०, २८९९ ९२३९, ९३२२८४०८४६

प्रकाशक
**श्री भगवती प्रकाशन**
६/१, साईविहार, कर्वेनगर,
पुणे - ४११ ०५२

।। श्रीगणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

# भूमिका

प.पू.श्रींचा पत्रव्यवहार त्यांच्या लोकसंग्रहाला साजेसा होता. पत्रांच्या माध्यमातून त्यांनी देशाच्याच काय पण प्रसंगाने जगाच्या कानाकोपऱ्यातल्या भक्तांशी सतत संपर्क ठेवला. रोज ते असंख्य पत्रे लिहित असत. ज्यांना प्रत्यक्षात भेटणे शक्य नव्हते त्यांची ते पत्राच्या माध्यमातून भेट घेत आणि त्या जीवाला भेटीचे समाधान देत. ज्यांची प्रकृती ठीक नसेल त्यांची श्रींना काळजी वाटत असे. अशा भक्तांना ते वारंवार पत्र पाठवून योग्य ते औषध, पथ्यपाणी चालू ठेवायला सांगून त्यांची खुशाली जाणून घेत. त्यांच्या पत्रातून ते एखाद्याला त्याने श्रींना पाठवलेल्या वस्तूची किंवा मनी ऑर्डरची पोच पावती असायची, कोणाचे यश मिळाल्याबद्दल कौतुक केलेले असायचे, कोणाला साधनेबद्दल मार्गदर्शन तर कोणाला सुखी जीवनाचा मार्ग दाखवलेला असायचा, कोणी दिलेल्या सहाकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केलेली असायची तर कोणाला संकटातून बाहेर पडण्याचा उपाय सांगितलेला असायचा. एखाद्या नवजात बालकाला आशीर्वाद दिलेले असायचे तर कोणी गेल्याचे सांत्वन केलेले असायचे. कोणाला त्यांच्या पत्रातून पुढील आयुष्य जगण्याचा आधार मिळायचा. प्रारब्धवशात कोणी कितीही प्रतिकूल परिस्थितीत सापडला असला तरी त्याच्या चुकांकडे अवास्तव लक्ष न देता त्या प्रतिकूलतेवर ईश्वरभक्तीच्या सहाय्याने मात करण्याचा मार्ग ते दाखवत. जवळच्या व्यक्तीचा वियोग झाला तर विवेकाने कसे राहावे हेही सोप्या भाषेत त्यांनी सांगून दुःखी जीवांचे दुःख हलके करण्याचा प्रयत्न केला आहे. पत्राच्या माध्यमातून आबालवृद्धात सर्वांना ते सतत मानसिक बल व प्रसंगाने संभाव्य धोक्याची सूचनाही देत. सांसारिक जीवन जगत असताना कर्तव्याला कुठेही चुकू नका व संसार देवाचा आहे म्हणून कर्तव्य कर्म करुन तो संसार देवाच्या चरणी वाहून आपल्याकडे अकर्तेपणा घेण्यास त्यांनी वारंवार सुचवले आहे. पण हे सुचवताना त्यांनी प्रयत्नवादाला कुठेही कमी लेखलेले नाही. प्रपंच व परमार्थ यांची सांगड कशी घालायची याचे

मार्गदर्शन अनेक पत्रातून पहायला मिळते. कोणी जर भ्रमात राहू लागला तर प्रेमाने पण स्पष्टपणें त्याला वास्तवतेची जाणीव करुन दिली आहे. कोणाला नुसते त्यांचे औपचारिक / अनौपचारिक पत्र वाचून अतिशय समाधान लाभायचे. त्यांचे नुसते अक्षर पाहून भक्तांना आनंद व्हायचा. वात्सल्य, आपुलकी, जिव्हाळा अशा त्यांच्या पत्र व्यवहाराला अनेक छटा होत्या. पत्राची लांबी हा त्यांचा निकष नव्हता. एखाद्याच्या अगदी संक्षिप्त पत्रांत चिंतनाकरिता केवढा व्यापक विषय असायचा. सर्व पत्रांतून मुख्य भर नामस्मरण, संतांची चरित्रे वाचणे, संतांचे ग्रंथ वाचणे, नियमित साधना करणे व ईश्वराची तळमळीने प्रार्थना करणे यावर दिसतो.

या संग्रहात त्यांची विषेश करुन उपदेशपर पत्रे आपल्या मार्गदर्शनाकरिता सादर केली आहेत.

ज्या ज्या भक्तांनी ही पत्रे उपलब्ध करुन दिली त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करायला शब्द नाहीत. त्या सर्वांच्या सहकार्याशिवाय हा संग्रह आपल्यासमोर येऊच शकला नसता. या संग्रहाकरिता अनेक भक्तांनी पत्रे दिली. त्या सर्वांचा या खंडात अंतर्भाव करणे शक्य नव्हते. श्रीकृपेने जर पुढचा पत्र संग्रह प्रकाशित करण्याचा योग आला तर त्यात अशा पत्रांचा निश्चित अंतर्भाव होईल. औपचारिक मायने व वाक्ये टाळून फक्त उपदेशावर यात जास्त भर देण्यात आला आहे. त्याचे चिंतन सर्वतोपरी मार्गदर्शन करणार आहे.

❄ ❄ ❄

सप्तशती गुरुचरित्रवाचन आपण रोज नेमाने चालू ठेवावे. नामस्मरण, बैठक यथाशक्ति चालू ठेवावे. नोकरीही चालू ठेवावी. यामुळे कोठेही तीर्थयात्रा वगैरे करण्यास सहाय्य होते. ईश्वरकृपेने सर्व ठीक होईल. काळजी नसावी.

❊ ❊ ❊

यथाशक्ति साधनाभ्यास, नामस्मरण, वाचन चालू ठेवावे. ईश्वरकृपेने प्रारब्ध प्रतिबंध दूर होऊन पूर्ववत सेवाकार्य चालू होईल. काळजी नसावी.

❊ ❊ ❊

उपासना सुरु असल्याचे वाचून समाधान वाटते. उपासना श्रद्धेने नित्य चालू ठेवावी. मध्ये काही प्रतिबंध झाला तरी ईश्वर कृपेने ते दूर होईल. 'कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे' अशी प्रभूची कृपा नेहमीच आहे. काळजीचे कारण नाही.

❊ ❊ ❊

काही दुरित प्रतिबंधामुळे साधनाभ्यासामध्ये खंड पडत असला तरी, नित्य ईशप्रार्थना, स्तोत्रपठण, संतांच्या ग्रंथांचे वाचन चालू ठेवल्यास पापक्षय होऊन प्रगती सुरु होते. ईशकृपेने सर्व घडून येते.

ही सद्वासना आपणास ईश्वरकृपेने व पूर्वसुकृताने लाभली आहे. 'सत्कर्मयोगे वय घालवावे' असा संतांचा आदेश आहे. त्याप्रमाणे आपले आचरण कल्याण करणारे आहे.

❊ ❊ ❊

ईशसेवा व्यवस्थित चालू असल्याचे समजून समाधान वाटले. काही काल प्रारब्धाने प्रतिबंध आला तरी ईश्वरकृपेने ते दूर होते. तळमळीने नित्य केल्यास परमात्मा सर्व साधनाभ्यास करवून घेतो यांत संशय नाही. काया, वाचा, मनाने जेव्हढी सेवा होईल तेव्हढी करावी म्हणजे दुरितक्षय होऊन ईश्वरसानिध्य घडून येते. आपणास तशी सद्वासना ईश्वरकृपेने मिळाली आहे त्याप्रमाणे सेवा करावी. कळावे.

❊ ❊ ❊

तुम्ही तेथे अधिक काम करुन इकडे पैसे पाठवणेची आवश्यकता नाही.

❄ ❄ ❄

वेळ मिळेल तेव्हां ईशसेवा आपणास घडत आहे ही ईशकृपा आहे.

❄ ❄ ❄

आपले श्री पिताजी, जेष्ठ बंधु, भावजय इत्यादि परिवाराकडेही आपणास लक्ष दिले पाहिजे. ते सर्व व्यावहारिक कर्तव्य सांभाळून धर्मकार्यांत द्रव्याचा व्यय करण्याचे ठरवावे. श्रीगुरुचरित्र पारायण सेवा श्रीप्रभू आपणाकडून करवून घेत आहेत ही मोठी ईश्वरकृपा आपणावर आहे. याचे आम्हाला खरे समाधान आहे.

❄ ❄ ❄

आपले श्रीगुरुचरित्रवाचन व साधनाभ्यास नित्य चालू आहे तो नियमाने चालू ठेवावा. श्रीमारुतिस्तोत्र, प्रार्थना नित्य चालू ठेवावी. ईशकृपेने दुरितक्षय होऊन चित्तास स्थिरता, शांती मिळेल. चिंता नसावी. '......' या मंत्राचा जप रोज ११ वेळा सकाळी, संध्याकाळी केव्हाही वेळ मिळेल तेव्हा करावा. **साधनाभ्यास उपासना नित्य नियमाने चालू राहाणे हाच खरा ईशगुरुप्रसाद आहे. फलसिद्धी ईशेच्छेने या जन्मी अथवा पुढच्या जन्मी केव्हातरी निश्चित मिळणारी आहे. त्याबद्दल साधकाने विचार करु नये. अशी बुद्धी ठेवावी. म्हणजे परमात्म्याची कृपा लांब नाही. आहार विहार चांगला सात्विक ठेऊन, सत्संगती प्रत्यक्ष या ग्रंथरुपाने ठेवावी. याने दु:संस्कार नाहीसे होऊन सात्विक संस्कार युक्त मन होते व उन्नती आपोआप होत राहाते.**

❄ ❄ ❄

संध्येची पोथी जवळ घेऊन संध्या केली तरी चालेल. हळूहळू पाठ होईल. तसेच श्रीगुरुचरित्राचे पारायण सात दिवसात होत नसेल तर १५ दिवसांत संपविले तरी चालेल. शक्ती आल्यावर सात दिवसांचे सुरु करता येईल. काळजी नसावी. 'दिगंबरा दिगंबरा' या मंत्राचा जप पडूनही करता येतो. तात्पर्य देवाचे नित्य स्मरण ठेवावे. म्हणजे पूर्ण कल्याण आहे.

❄ ❄ ❄

कलियुग आणि स्वत :चा दुरित भोगाचा काल मिळाला म्हणजे मन :स्ताप, साधनेमध्ये खंड असे प्रकार घडतील. अशा वेळी 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' या महामंत्राचा जप सव्वालक्ष, पाचलक्ष करण्याचा संकल्प करुन रोज वेळ मिळेल तसा चालू ठेवावा. याने अंत :शुद्धि, पूर्ण शांतीचा लाभ होऊन ईशकृपेने साधनाभ्यासही पूर्ववत चालू होतो. धैर्य धरुन ईश्वरप्रार्थना चालू ठेऊन सर्व साध्य करुन घ्यावे.

❄ ❄ ❄

आपले सविस्तर, अंतरंगद्योतक, स्पष्ट मोकळ्या मनाचे निदर्शक पत्र मिळाले. समाधान झाले. सौ. ताईमहाराजांच्या सारखा उत्तम त्यागाचा आदर्श श्रीभगवतीने आपणा सर्वांचे पुढे ठेवला आहे. 'उपासनेला दृढ चालवावे ! भूदेवसंतांसी सदा नमावे। सत्कर्मयोगे वय घालवावे। सर्वांमुखी मंगल बोलवावे।' हे श्रीसमर्थांचे स्पष्ट मार्गदर्शन, विश्वाची घटनारुप असणारे आपणापुढे आहे. येथील आम्हाला आधार असे श्रीभगवतीचे निवासस्थान, सुलतानपूरचे वृंदावनस्थान, आपणा सर्वांच्या त्याग भूमिकेतून निर्माण झाले आहे. असे असता कांही घडत नाही असे कसे म्हणता येईल. गोंधळून जाण्याचे तरी कारण काय ?

श्री भगवतीच्या प्रेरणेनेच आपण सर्व येथील व्यवस्थापक ठरला आहात. तथापि सर्व प्रतिबंध, गोंधळ दूर करुन कार्य पुढे उत्तम चालणेची पूर्ण शक्ती श्रीजगदंबेचीच आहे. आपण सर्व केवळ निमित्तमात्र आहोत अशा विश्वासाने चिंतामुक्त होऊन, 'सत्कर्मयोगे वय घालवावे' हे तप करता येईल. सौ. ताईमहाराजांसारख्या देवीचेच साक्षात् मार्गदर्शन व आशीर्वचन आहेच. सवडीने अधिक विचार होईल.

❄ ❄ ❄

सध्या आपली श्रीगुरुचरित्रसप्ताह पारायण सेवा अखंड चालू आहे. ती चालू ठेवावी. ती अखंडीत चालू राहाणेबद्दल श्रीदत्तप्रभूंची व श्रीमहाराजांची नित्य प्रार्थनाही करावी. त्यांचे आदेशाप्रमाणे संन्यास, गृहस्थाश्रम जे योग्य

ठरेल ते घडून येईल. आज त्याचा विचार करण्याचे कारण नाही. सेवा मात्र मनोभावे अखंड चालू ठेवावी एवढे आपले कर्तव्य करीत असावे. सर्वसत्ताधीश परमात्मा आपणाकडून सेवा करवून घेईल. काळजी नसावी.

❈ ❈ ❈

येथे श्रीवामननिवासाचे बांधकामास आरंभ झाला आहे. बरेच मोठे खर्चाचे काम आहे. श्रीमहाराजांचे कृपेनेच ते पूर्ण होणारे आहे. सज्जन धर्मशीलांचे कानावर हे घालावयाचे. फक्त वाणीचे कार्य करावयाचे. बुद्धीला प्रेरणा करुन सिद्धीस नेणेस परमात्मा समर्थ आहे. अशा पद्धतीने कार्य चालू आहे.

काया, वाचा, मनाने सेवा करवून घ्यावी अशी प्रार्थना श्रीदत्तगुरुंचे जवळ तळमळीने नित्य करावी. त्यांचे कृपेनेच सर्व कार्यसिद्धी होईल. काळजी नसावी.

❈ ❈ ❈

आपणास एक सांत्वन पत्र पाठवले होते ते मिळाले असेलच. दु :ख आवरुन आपले प्राप्त कर्तव्य सुरु झाले असेलच. ईश्वरोपासना होईल तशी यथाशक्ती चालू ठेवावी. परमात्मा चित्ताला शांती देण्यास समर्थ आहे. काळजी नसावी.

❈ ❈ ❈

पूर्व सुकृतानुसार आपणांस माणगांव येथे श्रीमहाराजांचे जन्मभूमीत सात श्रीगुरुचरित्र पारायणे करणेची प्रेरणा श्रीदत्तप्रभूंनी केल्याचे वाचून संतोष झाला. त्या पवित्र भूमीत आपले राहणे, सात सप्ताह होऊन प्रभूची वाङ्मयसेवाही आपणास घडत आहे हा अपूर्व योग प्रभूकृपेने आला आहे. यामुळे दैवीसंपत्तीचे आपण अधिकारी आहात असे समजणेस हरकत नाही. 'सत्कर्मयोगे वय घालवावे...' संतांचा आदेश आपणासमोर नित्य आहे.

❈ ❈ ❈

काही तरी निश्चित ध्येयाने उपासना अखंड चालू रहावी. त्याकरिता नोकरी सोडावी लागली तरी चालेल. 'खर्चाकरिता पूर्व पेन्शनची व्यवस्था आहेच' इत्यादी आपले पत्रातील विचार अयोग्य नाहीत. तळमळीचा उत्तम संकल्प ईशकृपेने पूर्णतेस जातो. काळजीचे कारण नाही. याबद्दल काही विचार पुढीलप्रमाणे मांडत आहे. याचाही विचार करुन ठरविणे बरे असे वाटते. सध्या नोकरीमध्ये आपला वेळ किती जातो ? किती रिकामा रहातो ? सकाळी नोकरीवर किती वाजता जावे लागते ? हे पाहून दिवसातून दोन तास जर मिळत असले तर, सकाळी लवकर उठून करता आल्यास सकाळी किंवा संध्याकाळी आल्यावर स्नान करुन, रोज १२०० गायत्री मंत्राचा जप करता येईल काय ? याचा विचार करावा. काही दिवस नोकरी सांभाळून उपासना करण्याचा असा अभ्यास चालू ठेवणे बरे. सोलापूरचे प्रा.राजाभाऊ जोशी सकाळी ७ वाजता कॉलेजमध्ये जात होते. तत्पूर्वी ते पहाटे ३/४ वाजता उठून स्नान संध्या करुन २४०० गायत्री जप करुन जात होते. तीन वर्षात याप्रमाणे त्यांचे चोवीस लाखाचे गायत्री पुरश्चरण पार पडले. १२०० जप रोज झाल्यास थोडा अधिक काळ लागेल हाही विचार करावा.

❋ ❋ ❋

कृष्णास्नान, दर्शन पूजन, काया, वाचा, मनाने यथाशक्ति सेवा ईशकृपेने घडेल. मध्ये मध्ये रजा घेऊन घडेल तशी सेवा करीत रहावे. यथाशक्ती परोपकार करीत रहाणे, मानापमानाकडे लक्षं न देणे, नामस्मरण चालू ठेवणे इत्यादि. ईशसेवा नोकरी सांभाळूनही होऊ शकेल असे वाटते.

❋ ❋ ❋

आता आपले वयास पंचावन्न वर्षे पूर्ण असल्यामुळे यावेळी सेवानिवृत होऊन कुरवपुरी सेवेस राहाणेचा आपला विचार चांगला आहे. तसे करणेस हरकत नाही. तसे सेवानिवृत्तीचे पत्र शासनाकडे पाठवून द्यावे. आता यापुढे यावज्जीव ईश्वर सेवेचेच ध्येय ठरवावे. ईश्वरकृपेने आपला संकल्प पूर्ण होईल. काळजी नसावी. घरजमीन बंधूचे नावे करुन दिली ते बरे झाले. त्यांचे प्रपंचाला

सहाय्य होत राहून तेही आशिर्वाद मिळतील. परमात्मा सर्व विश्वाचा पालनकर्ता आहे. 'योगक्षेमं वहाम्यहम्' हे त्याचे आश्वासन आहे. त्याची सेवा अखंड चालवावी. कळावे.

❋ ❋ ❋

व्यवहारातील अडचणी सर्वांचे एकमताने सोडविण्याचा प्रयत्न प्रथम करणे बरे असे वाटते. बंधूना एकदा सांगून पहावे. त्यांना पसंत न पडल्यास कायद्याप्रमाणे नाव लावण्याचा प्रयत्न करावा. दोघांही बहिणींची संमती पत्रे प्रथम घेतली पाहिजेत. योग्य वकिलांचे सहाय्याने सर्व करावे. वकिलांचेकडूनच बंधूना सांगून पहावे. ईश्वरप्रार्थना पूर्वक सर्व करावे. ईशकृपेने यश मिळेल.

२. जागेबद्दल विकण्याची गडबड केल्यास किंमत कमी येईल. काही दिवस वाट पाहून, योग्य किंमत आल्यावर विकून एखादी खोली रहाण्याकरितां बांधणेचे जमलेस पहावे. (भाड्याने देऊ नये).

३. साधनाभ्यास, उपासना, नामस्मरणादि नित्य प्रार्थनापूर्वक चालू ठेवलेस ईश्वरकृपेने प्रगती होईल. पूर्वप्रारब्धाने मध्ये एखादेवेळी प्रतिबंध आला तरी उपासना, प्रार्थना नित्य चालू ठेवावी, प्रभूकृपेने दुरितक्षय होत राहून प्रगती होईल. निराश होऊ नये.

❋ ❋ ❋

आयुष्मान बटुनी आता रोज संध्या व गायत्रीमंत्र जप करणे आवश्यक आहे. याने बुद्धी विकास होऊन दुरितक्षय, कल्याण होईल.

❋ ❋ ❋

आपले पत्र विचार करण्यासारखे आहे. नोकरी पूर्णपणे सोडून द्यावी कां, मध्ये मध्ये रजा घेऊन ईश्वरोपासना त्या अवधीत सतत करावी ? हाच विचार झाला पाहिजे. नोकरी सोडण्यास वेळ लागत नाही. पण सोडल्यानंतर, जर नोकरी सोडली नसती तर बरे झाले असते, असे वाटून उपयोग नाही. तसे वाटत राहील्यास अनुष्ठानाकडे सतत लक्ष रहाणार नाही. आर्थिक दृष्टीनेही

चिंता निर्माण होईल. याचाही विचार करावा. आपल्यापुरते आपण सदाचरण ठेऊन वागले, तर ईश्वराच्या दरबारात आपण निर्दोष ठरुन पुढेही उत्तम उपासना होण्यासारखी एकाग्रता, परिस्थिती ईश्वरकृपेने सहज मिळेल. आणि स्थिरतेने, बाह्यव्यवहार विसरुन झालेली थोडीही उपासना उत्तम ठरेल. या तळमळीने पुढील जन्मीही निर्वेध ईश्वरोपासनाच घडून जन्माचे सार्थक होईल. तेव्हा नोकरी सोडून उपासना करावी का चालूच ठेऊन मध्ये मध्ये महिन्याची रजा घेऊन करावी याचा विचार करुनच पुढील दिशा ठरविणे बरे असे वाटते. आपणही विचार करावा. परमात्माच बुद्धीला प्रेरक आहे.

❄ ❄ ❄

अभ्यास चांगला करुन विद्या उत्तम मिळवावी. ब्राह्मणाचे खरे धन विद्या हेंच आहे. .......सौ....... यांनी जी श्रीदत्तप्रभूंची सेवा नित्य चालविली आहे त्या पुण्याईचें फल सर्वांना मिळत आहे. हें नित्यस्मरणांत ठेऊन त्यांचे आज्ञेत वागावें. यानेच तुमचे भावी जीवन सुखाचे होईल. सवडीनें शनिवारी रविवारीं सवड काढून देवपूजा वगैरे ब्रह्मकर्म शिकावे. ....... पूजेमध्ये सहाय्य करीत असावे. तशी तुमची प्रवृत्ती लहानपणापासून आहेच हें आम्ही पहात आलों आहोत. चि. ....... शिक्षणाकडेही तुम्ही इत्यादि भावंडांनीं लक्ष घ्यावे. तुम्हाला ईश्वरसान्निध्य रहाण्याचे भाग्य लाभले आहे. हें चांगले आहे.

❄ ❄ ❄

माता पितरांची सेवा तुम्ही श्रद्धेने करुन सत्पुत्राचें कर्तव्य पार पाडीत आहात. यानें तुमचें सर्वात्मना कल्याण होणारें आहे.

❄ ❄ ❄

आपले भगवत्सेवा तपच आपला संसार, अमृतमय करण्यास समर्थ आहे यात संशय नाही. कळावे.

❄ ❄ ❄

अन्नोदक असेल तिथे फिरणे भाग आहे. सध्या कोणाच्या सेवावृत्तीचें बंधन नाही. तथापि अधिक दिवस कोठे राहाण्याचे सध्याचे दिवस नाहींत हें ही खरे आहे. प्रभूचे इच्छेप्रमाणें जे होईल ते खरें.

❉ ❉ ❉

तितिक्षेनेच ब्राह्मणांची योग्यता वाढत असते. श्रीदत्तप्रभूंना भक्ताची काळजी पूर्ण आहेच. त्या मंत्राचा जपही सुरु करावा. सव्वालक्ष एकदा झाला तरी तो चतुर्गुण म्हणजे पांच लक्ष व्हावा. सर्वांनी मिळून केला तरी चालेल. सायंकाळीही हातपाय धुऊन शुचितेनें केला तरी हरकत नाही. प्रत्येकानें रोज किती होईल तो वहीमध्यें लिहून ठेवावा.

❉ ❉ ❉

आपली ऋजूवृत्ति व कार्यदक्षता याहीं वयांत प्रशंसनीय आहे.

❉ ❉ ❉

'विषवृक्षोपि संवर्ध्य स्वयं छेत्तुमसांप्रतम' स्वत: लावलेलें विषाचें झाड देखील स्वत:च तोडणें अनुचित आहे असें श्री कालिदास लिहितात. तर मग श्री. .......चे अमृताचें झाड आपणच आज चाळीस वर्षांचेवर वाढवून तें स्वत: तोडणें कितपत उचित होईल याचाही विचार व्हावा.

❉ ❉ ❉

मातापितरांचे व श्रीदत्तप्रभूंचेकृपेनें आर्थिक दृष्टिने आपण उन्नतीच्या मार्गावर आहात हे उत्तम आहे. या द्रव्यातील कांही अंश मातापितरांचे सेवेप्रित्यर्थ, विद्यादान, अन्नदान इत्यादि धार्मिक कार्याकरितां खर्च करावा. त्यानें लक्ष्मी स्थैर्य लाभेल.

❉ ❉ ❉

आपण बरेच निराश झालेले दिसता. तसे होणेचे कारण नाहीं. श्री. पिताजींच्याप्रमाणे घरीही आपणांस श्रीदत्तांची उपासना चालू ठेवणें शक्य आहे.

मंदिराच्या बाहेरही परमात्मा आहे. श्रद्धाभक्तीने जेथे त्याचे आवाहन केले जाईल तेथे तो येऊन राहातो. मंदिरातील अर्चन सुटले तरी घरी अर्चन चालू ठेवता येईल.

❋ ❋ ❋

श्रीगुरुसेवा सुटली याबद्दल आपणास क्लेश वाटणे साहजिक आहे. पण आता आपण दूर राहिल्याने मन आपले श्री दत्तमंदिरांत रहाणार. या दृष्टीने हें योग्यच म्हणावे लागेल. मंदिरात असतांना सकाळी संध्याकाळी पूजा कर्मास जो वेळ आपणांस द्यावा लागला असता तो आता आपण घरी गुरुचरित्र वाचनास दिला म्हणजे नित्यसेवा चालू राहिली. फक्त स्थानभेद होईल. तो सुद्धा मन तिकडे ठेऊन केल्यास होणार नाही. सात दिवसांत श्रीगुरुचरित्राचे पारायण करणे झाल्यास एक दीडतास वेळ रोज द्यावा लागेल. तसे साधत असल्यास तसा नियम ठेवावा. तसे शक्य नसल्यास मासिक पारायणाचा नियम करणेस हरकत नाहीं. रोज दोन सवादोनशे ओव्या वाचल्या म्हणजे झाले. २० मिनिटाचे आंत हें वाचन होईल. २०-२१ व ३०-३१ हे अध्याय येतील त्या दिवशी ते सर्व वाचावे लागतील. अर्धा तास लागेल. असे तारतम्यानें ठरवून श्रीसेवा रोज न चुकता चालू ठेवावी म्हणजे प्रपंच, परमार्थ दोन्ही साधेल.

❋ ❋ ❋

आपण वर्षश्राद्ध उत्तम प्रकारे केले, प्रत्यक्ष गोप्रदान केले, इत्यादि सर्व त्यांनी सांगितलेले ऐकून समाधान वाटले. देवापितरांची सेवा यथाशक्ति करण्याने पूर्ण कल्याण होते ही बुद्धी लहानपणापासूनच आपणांस ईश्वराने दिली आहे. हिचा उपयोग जीवनांत करीत रहावे.

❋ ❋ ❋

आपलें काव्य वाचून समाधान वाटले. ईश्वराची देणगी आहे. प्रसंगानें ईशगुण वर्णनाकरिताही वाणीचा उपयोग करता येणेसारखा आहे. तो इहपर कल्याणप्रद आहे.

❋ ❋ ❋

लहान वयांत आपली धर्मश्रद्धा, मातृपितृभक्ती, ईश्वरनिष्ठा, सत्कर्मांची आवड, इत्यादि गुण पूर्वसुकृताचे द्योतक आहेत. ईश्वराची ही कृपा आहे. या बद्दल आम्हीही ईश्वराजवळ प्रार्थना करीत आहो.

❁ ❁ ❁

तुम्ही ही समदृष्टीने सर्वांना समाधान देता ही तपश्चर्या आहे.

❁ ❁ ❁

नागपुरला आपलें घरी सप्ताह करीत असल्याबद्दल श्री. ...... यांचेही पत्र आले आहे. नियम चुकू नये ही आपली इच्छा देवांनी पूर्ण केली. देवावर भार घातल्यावर सर्व मनासारखे घडून येतें, असा भगवद्भक्त महात्म्यांचा अनुभव आहे. वडिलांप्रमाणे आपण सर्व सेवा चालू ठेवली आहे, हे कल्याणावह आहे.

❁ ❁ ❁

हवामान तूर्त पाऊस नसल्यामुळे सर्वत्रच प्रतिकूल आहे. औषधोपचार, भगवन्नामस्मरण, प्रार्थना इत्यादि उपचारांनी प्रतिकूलदुरितक्षय होऊन सर्व ठीक होईल. काळजी नसावी. प्रपंच हा सुखदुःखसंमिश्र आहे.

❁ ❁ ❁

श्रीवामननिवासाचे काम येथे सुरु झालें आहे. त्या करिता फार खर्च येणार आहे म्हणून ठिकठिकाणी या कार्यास स्थिर सहाय्यक समिती नेमून कार्य सुरु करावे अशी प्रार्थना करण्याकरितांच आम्ही ठिकठिकाणी जातो. त्याप्रमाणे नाशिकलाही जाणेचे ठरवीत आहे. अनंतहस्ते परमात्माच कार्य पार पाडण्यास समर्थ आहे.

❁ ❁ ❁

येथील २/३ आठवडयाचे मुक्कामांत आपल्या श्रद्धायुक्त प्रेमादरभावाचें प्रात्यक्षिक घडून आल्यानें समाधान वाटले. आपल्या सौ. गृहिणी, श्री........ ह्याची सौ. पत्नी, लहान मुले सर्वांचेच प्रेम, आतिथ्य प्रशंसनीय आहे. ह्या

प्रांतात सर्वत्र श्रद्धाप्रेम, आतिथ्य उत्तम आहे असें सर्वांचेच मत आहे. हाच खरा जीवनांतील कल्याणाचा संतांचा मार्ग असून भारताचा विकास अंतरंग आहे.

❊ ❊ ❊

श्रीवामननिवासाचे बांधकाम सुरु झाले आहे. इकडे आता सर्वांचे लक्ष जाणे जरुर आहे. ईशगुरुप्रेरणेप्रमाणे यथाशक्ति सर्वांचे सहाय्यानेंच हें काम पूर्ण होईल अशी खात्री वाटते. एका व्यक्तीपेक्षा श्रीगुरुस्थानास सहाय्य केल्याने आपणा सर्वांस अधिक श्रेय मिळणार आहे. १०/१५ लाखाचे वर खर्च लागेल असें समजते. सर्वांतर्यामी सर्वधीप्रेरक परमात्माच सर्व समर्थ आहे.

❊ ❊ ❊

ईश्वरोपासनेकडे अधिकाधिक लक्ष दिल्याने शांती प्राप्त होणारी आहे. हाच संतांचा मार्ग आहे.

❊ ❊ ❊

आपण बंधू, माताजींचे सह देऊळगांवी येऊन पू.पिताजींचे स्मरणार्थ पुष्कळ मोठे द्रव्य दान तेथें ट्रस्टकडे अर्पण केले. हे आपले दातृत्व प्रशंसनीय व ईश्वरकृपासंवर्धक, कल्याण संपादक आहे यांत संशय नाही. आपण कोणालाही समजू न देताही आपले दातृत्व चालू आहे. हे परवा पुण्यास आल्यावर समजलें. पारमार्थिकदृष्टीने हें योग्य असे कोणी म्हणतील पण प्रपंचही आपला मोठा आहे. मुलामुलीचे शिक्षण, त्यांची मंगलकार्ये इत्यादि कर्तव्ये ही क्रमप्राप्त पार पाडण्याची जबाबदारी आपणांवर आहे हें विसरुन चालणार नाही. 'प्रपंच आधी करावा नेटका' असे समर्थ सांगतात. पू.पिताजींचे आशीर्वाद आपल्या पाठीशी आहेत. श्रीमाताजींच्याही मनाला अनुसरुन आपले वागणे आहे. हे सर्व प्रपंचास पोषक ठरणारे आहे.

❊ ❊ ❊

श्रीगुरुचरित्र सप्ताह पारायणही आपले वार्षिक होते ही परंपरा आपण चालू ठेवलेली ईशकृपासंपादक, कल्याणकारक आहे. प्रपंचांत राहूनही पारमार्थिक

कार्य करीत राहाण्याचे आपले संस्कार उत्तम आहेत. आपल्या पू.माता पितरांचीही पुण्याई आपल्या पाठीशी आहे, ही ईश्वरकृपाच आहे.

❄ ❄ ❄

तुमची दहावीची परीक्षा १५ तारखेपासून सुरु होत आहे. ईश्वर प्रार्थनापूर्वक, लक्षपूर्वक अभ्यास चालू ठेवावा म्हणजे ईश्वरकृपेने उत्तम यश प्राप्त होईल. काळजीचे कारण नाही. दुसरे दिवशी होणाऱ्या परीक्षा विषयाचा आदले दिवशी अभ्यास करुन ठेवावा. म्हणजे प्रश्नपत्रिका लिहितांना सर्व स्मरण चांगले होऊन चांगले लिहीले जाईल. 'घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते' हे पाच श्लोकांचे स्तोत्र म्हणून प्रार्थना करुन पेपर लिहिण्यास जावे. सर्व ठीक होईल.

❄ ❄ ❄

विवेकाने दुःख आवरण्याचा प्रयत्न करुन सर्व पोष्य वर्गाचेही सांत्वन करुन प्राप्त कर्तव्याकडे लक्ष दिले पाहिजे. विवेक व काळच दुःख कमी करणारा आहे.

❄ ❄ ❄

आपली परिक्षा जवळ आल्याने अभ्यास लक्षपूर्वक करावा. ईश्वरप्रार्थना नित्यश्रद्धेने चालू ठेवावी. ईश्वरकृपेने परीक्षेत यश मिळेल. काळजीचे कारण नाही.

❄ ❄ ❄

(हा धुंडिराज महाराजांनी लिहिलेल्या पत्रातील मजकूर आहे.) नवीन घरची वास्तुशांती झाली आहेच. पुनः ती करणेची जरुर नाही. सत्यनारायण करावा व नवीन घरात प्रवेश करणेपूर्वी तेथे उदकशांती करुन घ्यावी. वास्तू निर्दोष होईल. सर्व ठीक होईल. आपले शाखेने उदकशांती न होईल तर ऋक् शाखीयांकडून ती केली तरी चालेल. पहा, सर्व विचार करुन करावे.

❄ ❄ ❄

सौ. ताईंच्या प्रभावाने निर्माण झालेल्या, श्री.काजळकर महाराज दत्तमंदिराबद्दलही सर्वांनी विचार केला पाहिजे. ही सर्वोपकारक आवश्यक गोष्ट आहे.

❊ ❊ ❊

प्रपंचाकडे सर्वांचे, पशुपक्षांचेसुद्धा लक्ष असते. पण या, सौ. ताईंच्या तपाने, त्यागाने, सर्व समत्व बुद्धीने निर्माण झालेल्या सर्वोपकारक देवस्थानाकडे सर्वानी लक्ष पुरविल्यास सर्वांचाच स्वार्थ, परमार्थ साधून कल्याण होणारे आहे.

❊ ❊ ❊

संतांच्या संगतीत आपण सर्व आहात. हे आपणा सर्वांचे पूर्वसुकृत आहे असे आम्हाला वाटते. सौ.ताईंच्या जवळ आपपरभाव नाही. सर्वत्र समदृष्टी ठेऊन, पूर्ण त्यागाने त्यांचे वागणे आहे. यामुळे त्या स्थानाची अभिवृद्धी त्यांच्या तप:प्रभावाने सहज होणारी आहे हे लक्षात नित्य ठेऊन कार्य करीत राहिल्यास इष्ट कार्यसिद्धी सहज होईल.

❊ ❊ ❊

स्वत:च्या मानापमानाकडे पूर्ण दुर्लक्ष करुनच उत्तम सात्विक सेवा, ईशकृपासंपादक करता येते.

❊ ❊ ❊

श्री.काजळकरमहाराज आणि सौ.ताई, यांच्या त्यागपूर्वक असणाऱ्या धर्मभावनेने व तपोबलाने, त्या ठिकाणी नित्य चालू असणारे अन्नदान, भजन, पूजन इत्यादि सत्कार्ये सर्वांच्या दृष्टीसमोर आहेत. यामुळे सर्वही अबालवृद्ध जनतेची श्रद्धा, भक्ती त्या स्थानाबद्दल वाढत आहे. याचा विचार आपणासारख्या निकटवर्तीयांनी केला पाहिजे आणि सौ.ताईंच्या आज्ञेचे पालन करुन, त्यांचे समाधान वाढवून आपले कल्याण साधले पाहिजे.

काम, क्रोध व लोभ हे तीन मोठे शत्रू आहेत. यांना घालविणेकरता

संतांच्या संगतीचा उपयोग करुन घ्यावयाचा असतो. कोणत्याही स्त्री बद्दल आसक्ति न ठेवणे, त्याच्यापासून दूर असणे, म्हणजे काम शत्रूपासून दूर असणे, 'पराविया नारी रखुमाईसमान' असे श्रीतुकाराम महाराज म्हणतात. संतांच्या सेवेकरिता येणाऱ्या कोणावरही न रागावणे म्हणजे क्रोध शत्रूपासून दूर राहणे. आणि लोभ हा तर फार मोठा शत्रू आहे. याच्यामुळेच सर्व पापे घडतात. या करिता संतांच्या संगतीत, 'निर्वाहपुरते अन्न आच्छादन' या संतवचनाप्रमाणे मिळेल तो प्रसाद घेऊन, काया, वाचा, मन व धन याने यथाशक्ति सेवा करण्याची बुद्धी ठेवल्यास मानवजन्माचे सार्थक होते. यांकरितां या पवित्र स्थानाबद्दल आदर, सहाय्य बुद्धी बाळगून यथाशक्ति सेवा करावी. म्हणजे लोभशत्रूही नाहीसा होईल. सौ. ताईही हे स्थान देवाचे आहे, देवाने वाढवावे अशीच प्रार्थना करितात. अन्नही घेत नाहीत. सर्वांनाही याबद्दल आसक्ती वाटू नये अशी प्रार्थना करतात. हा सर्व विचार करुन तुम्ही सर्वांनी सौ. ताईंचे आज्ञेप्रमाणे आपले कल्याण करुन घ्यावे. त्यांच्या समाधानानेच स्थानातील सर्वांची समृद्धि साधेल. या पेक्षा अधिक काय लिहावे?

❄ ❄ ❄

सिंहस्थ संपून कन्यागतास आरंभ होतो. एक वर्षपर्यंत पर्वकाळ असतो. केव्हांही वाडीला जाऊन तीर्थश्राद्ध करता येते.

❄ ❄ ❄

सध्या सकाळी लवकर आपणांस कॉलेजमध्ये जावे लागते. नंतर नोकरीवरही जावे लागते. करिता आता या पुढे श्रीगुरुचरित्र सप्ताह पारायण करण्यास आपणांस वेळ सापडणार नाही. म्हणून केवळ 'दिगंबरा दिगंबरा .........' या मंत्राचा जप सर्व कल्याणार्थ वेळ मिळेल तेव्हां रोज दोन माळा चालू ठेवावा. याला सोवळयासाठी प्रतिबंध रहाणार नाही. तरी याप्रमाणे चालू ठेवून अभ्यासाकडे लक्ष द्यावे. ईश्वरकृपेने सर्व ठीक होईल.

❄ ❄ ❄

सौ. ताईमहाराजांना सादर नमस्कार. कळावे. प्रेमछत्र अखंडित असावे ही प्रार्थना.

❈ ❈ ❈

मध्ये मध्ये संकटप्रसंगी अथवा अनुकूलतेच्यावेळीही अशी सप्ताह सेवा करावी. या मुळे पाप, ताप सर्व दूर होऊन कल्याण होईल. शाळा असली तरी पहाटे उठून वाचन करुन शाळेत जाता येईल. परमात्मा भवरोगवैद्य आहे हा विश्वास असावा.

❈ ❈ ❈

सौ........प्रसूत होऊन कन्यारत्न झाल्याचे वाचून आनंद झाला. पहिली मुलगी लवकर आईच्या हाताखाली कामाला येऊन तिला समाधान, सुख देते. बाकी सर्व ठीक आहे.

❈ ❈ ❈

सध्या सर्वांनी कांहीतरी उद्योग करुन अर्थार्जन केले पाहिजे असा काळ आहे. निरलसपणे प्रयत्न केल्यास अनुकूलता लाभेल. या पेक्षा अधिक काय लिहावे?

❈ ❈ ❈

आपण श्रद्धेनें श्रीगुरुचरित्रसप्ताह पारायण चालू ठेवावे. त्यांची प्रकृती लवकर पूर्ण निर्दोष, पूर्ववत कार्यक्षम आरोग्यसंपन्न व्हावी याबद्दल रोज श्रीप्रभूजवळ प्रार्थना करावी. प्रभूकृपेने सर्व ठीक होईल. काळजीचे कारण नाही.

❈ ❈ ❈

संसारात अनुकूल प्रतिकूल दोन्ही परिस्थिती येतात जातात. अशावेळी शांतपणे देवाची प्रार्थना, नामस्मरण, संतांच्या, देवाच्या चरित्राचे सवडीने वाचन करीत रहावे म्हणजे ईश्वरकृपेने चित्ताला शांती मिळते.

❈ ❈ ❈

तो जप आपण स्वत: वेळ मिळेल तितका करणें चांगले. प्रकृती बिघडली असेल तर त्यानेच औषध घेतले पाहिजे.

❄ ❄ ❄

एकदा स्वत्वत्याग केल्यावर तीच वस्तू पुन: घेऊ नये. मनांतही तसें आणू नये.

❄ ❄ ❄

युधिष्ठीराच्या प्रार्थनेप्रमाणे त्यांच्या राजसूय यज्ञाचे नेतृत्व श्रीकृष्णप्रभूंनी स्वीकारुन तो यज्ञ सांग संपूर्ण केला, तसेच सर्व शास्त्रीय व्यवहारीक नेतृत्व, शास्त्रीय व्यवहारीक जबाबदारी सर्वमताने आपणावरच आहे हे लक्षात असावे.

❄ ❄ ❄

आपले पत्र मिळाले. दिगंबरा मंत्राचे भजन आपण सुरु केलेले वाचून समाधान झाले. भजन करणारांचेच केवळ कल्याण आहे असे नसून त्या घरांत, गांवांत राहाणाऱ्यांचे सर्वांचेच कल्याण होणारें आहे. श्रद्धाभक्तीने सर्व करावे. फलदाता परमात्मा समर्थ आहे. काळजी नसावी.

❄ ❄ ❄

सौ. ताईमहाराजांच्या सदिच्छेनुसार सर्व सज्जनदात्यानी दूर असणाऱ्या स्थानांत एका श्रेष्ठ सतीचे स्मारक वृंदावन निर्माण करण्याचे कार्य, तन, मन व धनाचे सहाय्य करुन पूर्ण केले याबद्दल आपण सर्व कार्यकर्ते धन्यवादास पात्र आहात. **ईश्वर किंवा ईश्वरभक्त यांच्या स्थानाचा जीर्णोद्धार करणे हे उत्तम शास्त्रविहित कर्म, स्वपरकल्याणसाधक असल्याचे श्रीभगवान् गोपालकृष्णांनी उद्धवजी परम भक्तांना सांगितले आहे. असे मोठे पुण्यकर्म आपणाकडून ईशकृपेने, पूर्वसुकृतानुसार घडून आले आहे हे पाहून समाधान वाटते. याचे अनंत फल श्रीभगवानच आपणांस देणेस (न मागतासुद्धा) पूर्ण समर्थ आहे.**

सौ. ताईमहाराजांची सत्कर्म निष्ठा व तशी शक्ती प्रशंसनीय, अनुकरणीय

आहे. त्यांचा संकल्प प्रभाव पुष्कळ दिवसापासून असलेला, या पूर्णतेस कारण झाला असें समजण्यास हरकत नाही.

❄ ❄ ❄

प्रकृति बरी आहे. वाडीसही कांही त्रास झाला नाही. तेथे देवमंदिरापर्यंत खाली रिक्षाने जाण्याचा मार्ग झाल्याने व्यवस्थित रोज दर्शन घडलें. एक दिवस कांही पायऱ्या उतरुन नदीपर्यंत जाता आले. तेथे प्रत्यक्ष प्रवाहात सर्व स्नानविधी व्यवस्थित पार पडला. दोन वर्षांनी हा योग श्रीकृपेने आला. **बारा वर्षांनी गंगामाई येते ते स्नान घडणे आवश्यक होते ते श्रीगुरुकृपेने घडलें. सर्व व्यवस्थित पार पडले.**

❄ ❄ ❄

श्री. ....... वाडीस प्रतिवर्षाप्रमाणे जाऊन महापूजा, अन्नदान करुन येत आहेत ही त्यांची व मातापितरांची नैसर्गिक श्रद्धाबुद्धी पुढेही वंशपरंपरा ईशकृपेने अनुवृत्त रहाणारच आहे. चिंतेचे कारण काय ? सर्व कार्यास कारण असणाऱ्या बुद्धीला प्रेरक ईश्वरशक्तीच असते. हीच शक्तिपातयोगाची शिकवण आहे. व सर्व संतमहात्म्यांची धारणा आहे. म्हणूनच त्यांचा संकल्प सत्य ठरुन ते निरहंकारी राहू शकतात. संकल्पाप्रमाणे कार्य सिद्धी घडून येणे हे निरहंकार झालेल्या जीवाला अनुभूतीसारखे वाटण्यास काय हरकत आहे. 'केनापि देवेन हृदिस्थितेन यथा नियुक्तोस्मि तथा करोमि' ही बुद्धी दृढ रहाणे म्हणजेच ईशशक्तीचा अनुभव आहे. सगुण साक्षात्कार ही भूमिका बहुत सुकृताधीन आहे. पण तत्पूर्वी व तदनंतरही सर्वशक्ती परमेश्वराचीच आहे ही परोक्ष भूमिका दृढ होणेही बहुतसुकृताचेच फळ आहे आणि निर्विकार राहून लोककार्य करीत राहाण्याच्या अनुभवाने ती दृढ होणारी आहे. केवळ सगुण साक्षात्कार म्हणजेच अनुभूती समजण्याचे कारण नाही. चित्त शांत राहाणे हीच अनुभूती आहे.

चित्तशांती हा ईशस्वरुपाचा एक प्रकारे साक्षात्कारच आहे. 'परोहि योगो मनसः समाधिः' म्हणजे मनाचे समाधान, शांती हाच मोठा योग आहे असे श्रीभगवान् उद्धवजींना सांगतात. राग, द्वेष याप्रमाणें भिती, हाही मनाचा

विकारच आहे. विवेकानेच सर्व विकार दूर करण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. गीतेच्या दुसऱ्या अध्यायात आरंभी 'अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारता। अव्यक्तानिधानान्येव तत्र का परिदेवना' या श्लोकावरील श्रीज्ञानेश्वरीचे विवरणात हा विवेक आला असेल त्याचे चिंतन, मृत्यूचीही भिती दूर करीत 'पापं तापं व्याधिमाधिंच दैन्यं, भीतिंक्लेशं......, घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते' या श्लोकाचे चिंतन सर्व भिती दूर करणारे आहे.

वाडीला एक मोठे सत्पुरुष माडीवर रहातात ते कार्तिकि पौर्णिमेस चातुर्मास संपवून कांचीला श्रीशंकराचार्यांचेकडे जाणार आहेत. त्यांचे सानिध्य हीच प्रार्थना परवा येतांना करुन आलो. श्रीगुरुमहाराजांचे आज्ञापत्राप्रमाणे अमरापुरी वाङ्मयसेवा या जन्मात घडली नाही तरी हा जन्म लवकर संपून पुढील जन्म चांगल्या कुलात मिळून ती वाङ्मय सेवा पूर्ण व्हावी. असा आशीर्वाद द्यावा अशी प्रार्थना करुन आलो. देवाची इच्छा काय आहे पहावे.

❄ ❄ ❄

आपले पू.पिताजी व्यक्तरुपाने नसले तरी, अव्यक्त रुपानें आपणा सर्व सत्कर्मशील आत्मीयजनांना आशीर्वाद देत राहाणारच. आपल्या सेवाभावाने व पुण्यकर्मप्रेमामुळे त्यांचे पूर्ण समाधान झालेले आहे. ईशगुरुमहाराजांच्या कृपेने आजपर्यंत गुरुपौर्णिमा नैसर्गिक अभिरुची, आपल्या पू. पिताजींच्या व आपणा सर्वांच्या पूर्ण सहाय्याने फलद्रूप होत आलेली पुढेही ईशगुरुकृपेने नित्य प्रतिवार्षिक चालू राहाणेस हरकत नाहीं. यामुळे 'सर्वांमुखी मंगल बोलवावे' या महात्म्यांचे आदेशाचे पालन केल्याचे श्रेय सर्व कार्यकर्त्यांना लाभणारे आहे.

❄ ❄ ❄

आपले सहाय्य अकोल्यास सप्ताहसमयी फार झालें त्याचें स्मरण वारंवार होते. सत्कार्याबद्दल आपली श्रद्धा व उत्साह प्रशंसनीय. ही ईशकृपा आहे यांत संशय नाहीं. प्रपंचकर्तव्य दक्षतेनें करुन ईशनामस्मरणादि सेवाही यथावसर करीत असावे. यानें पूर्ण कल्याण होईल.

❄ ❄ ❄

आपली नियोजित वास्तू पूर्ण होत आल्याचें वाचून समाधान वाटलें. योग्य ब्रह्मवृंदाकडून योग्य मुहूर्तावर वास्तुशांती करुन घ्यावी. आम्ही मनाने त्यावेळी तेथें आहोतच. काळजी नसावी.

❊ ❊ ❊

आपण हें काम पूर्ण करुन वडिलाना संतोष दिला व पुत्रकर्तव्य पार पाडले हें आपणांस भूषण आहे.

❊ ❊ ❊

या निमित्तानें देव, मातापिता, गुरुजन, द्विज सर्वांचाच परामर्श आपण उत्तमप्रकारे घेतला. ही प्रपंचात राहून परमार्थ साधणेची आपली वृत्ती ईशकृपा संपादक आहे.

❊ ❊ ❊

आपले चिरंजीवांचे प्रकृतीस ईश्वरकृपेने आराम पडल्याचे वाचून समाधान वाटले. ईश्वराची प्रार्थना नित्य चालू ठेवावी म्हणजे कोणतीही बाधा होणार नाही. 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' या महामंत्राचा जप रोज सर्वांनी एक माळ तरी करण्याचा नियम करावा म्हणजे प्रभूकृपेनें सर्व ठीक होईल. सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

❊ ❊ ❊

आता आपण अकोल्यास आपल्या वास्तूतच राहाणेस आला. हीही एक प्रकारची बढतीच ईश्वरकृपेने मिळाली असे मानणेस हरकत नाहीं.

❊ ❊ ❊

आपण दि..... वारी पहाटे ५-५.३० ला स्नान करुन, देवापुढे नारळ ठेऊन,कृपा करणेची प्रार्थना करुन, ठीक ६ वाजतां डोळे झाकून शांत चित्ताने बसावे. वडिल मंडळींची आज्ञा घेऊन आरंभ करावा. श्रीगुरुमहाराज कृपा करतील. काळजी नसावी. यापुढेही रोज सवडीप्रमाणे बसण्याचा अभ्यास चालू

ठेवावा. तो प्रसादाचा नारळ दुसरे दिवशी फोडून सर्वांनी प्रसाद घ्यावा. 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' या महामंत्राचा जप, रोज सवडीप्रमाणे दोन माळा श्रद्धेने करावा,कल्याण होईल. रोजचा शाळेचा अभ्यास सांभाळून सर्व करावे. कळावे.

❄ ❄ ❄

ईश्वरप्रार्थनापूर्वक साधनाभ्यास नित्य चालू ठेवणे हितावह आहे. संतांच्या ग्रंथांचे वाचनही सवडीने करीत असावे. त्याने योग्य मार्गदर्शन मिळत राहून कल्याण होईल.

श्रीगजाननमूर्ती उजव्या सोंडेची असली तरी पूजा करणेस हरकत नाही. रोज दूर्वा शमीसहित पूजा झाली म्हणजे झाले. शंकेमुळे पूजेमध्ये ती मूर्ती ठेवली नसल्यास कपाटात ठेऊन द्यावी. प्राणप्रतिष्ठा झाली नसेल तर ठेऊन द्यावी.

ईश्वरप्रार्थना, जप, नामस्मरण सवडीने रोज चालू असावे. ईशकृपेने सर्व प्रतिबंध दूर होऊन कल्याण होईल. सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद. कळावे.

❄ ❄ ❄

झाले ते होऊन गेले. दंडापेक्षा साम हा उपाय बरा. असो. 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' या महामंत्राचा जप, एकंदर सवालक्ष करण्याचे ठरवून, सर्वांनी मिळून जप केल्यास जपसंख्या लवकर पूर्ण होईल. ही संख्या संपल्यावर लगेच पुन : आरंभ जपास करावा. सर्व शांतता होईपर्यंत ही प्रार्थना, उपासना चालू ठेवावी. श्रद्धेने सर्व करावे. कल्याण होईल. त्या मुलीलाही सांगावे. ईशकृपेने शांतीलाभ होईल. काळजीचे कारण नाही.

❄ ❄ ❄

ईश्वरप्रार्थना नित्य करुन गाण्याचा अभ्यास चालू ठेवावा. ईशकृपेने यश मिळेल. काळजीचे कारण नाही.

❊ ❊ ❊

ईश्वरप्रार्थना, नामस्मरण, जप, संतांच्या ग्रंथाचे वाचन, चिंतन सवडीने चालू ठेवावे. **हळू हळू ईश्वरकृपेने सर्वत्र ऐक्यबुद्धी उत्पन्न होऊन समाधान मिळते. हे अंतिम साध्य आहे. चित्तशुद्धी जशी होत जाईल तसे हे सर्व घडून येईल.** मानसिक जप उत्तम. तो सावकाश, थोडा होतो पण याकिरता चित्ताच्या एकाग्रतेचा अभ्यास होतो. समर्पण बुद्धी म्हणजे ईश्वराचेच सर्व कर्तृत्व आहे. आपले जीवांचे कांही कर्तृत्व नाही. अशी भावना झाली पाहिजे. कर्तृत्वाभिमान सर्व गेला पाहिजे. ईश्वरकृपेनें, उपासनेने हें साध्य होणारे आहे. सहवासापेक्षा **स्मरण, आदर मनामध्ये राहाणे हे श्रेष्ठ आहे. सहवास बहिरंग आहे. आपला साधनाभ्यास, उपासना, प्रार्थना नित्य चालू ठेवणेचा प्रयत्न केला पाहिजे. लोकांच्या गुणदोषांकडे लक्ष न देता उपेक्षाबुद्धीचाच अभ्यास केला पाहिजे. आपण काही सुधारणा करु शकत नाही. 'करावे तसे भरावे' हे ज्याचे त्याचे कर्मफल सांगून ठेवले आहेच.** आपले विचार चांगले आहेत, ईश्वरकृपेने सर्व कल्याण होईल. काळजीचे कारण नाही.

❊ ❊ ❊

पुढील अभंगाला योग्य चाल लावून तो मुलांना शिकवण्यास त्यांना सांगावे व आपणही आपल्या वर्गांतील मुलांना मध्येमध्ये असे शिक्षण द्यावे.

देवदेव दत्ता तव पदीं चित्ता। ठरवी विश्वनाथा कथा गाता।।१।। माझी वाणी गुण तुझे वाखाणून। रमो हेंचि धन दान देगा।।२।। तुझ्या भजकांची सेवा करो कर। हाचि देई वर वरदेशा।।३।। मन द्रवो माझे गुण गाता तुझे। उतरे कर्म ओझे माझे जेणे।।४।। सकंप रोमांच अंगी व्हावें उंच। न दिसावे उंच नीच कोठे।।५।। जेवी श्येन जाळे तोडोनिया पळे। तैसे भवजाळे तोडवी हे।।६।। आता माझा भाव तव पदी ठाव। घेवो हे वैभव नित्य असो।।७।।

❊ ❊ ❊

'गृहेषु अतिथिवद्वसेत्' घरामध्ये पाहुण्याप्रमाणे रहावे. असे संतमहात्मे शास्त्रज्ञ सांगतात ते योग्य आहे. यामुळे अनायासे निरहंकारवृत्ती, मानापमानाकडे दुर्लक्ष, स्पर्धा इत्यादि दोष कमी होत जाऊन सामाजिक कार्यही शुद्धबुद्धीने होऊ शकते. येथे मी एक अतिथी आहे मला हे घर सोडून केव्हांतरी दुसऱ्याघरी (देहांत) जायचे आहे या भावनेने अभ्यासाने ममता, आसक्ति कमी होऊ शकते. 'अनित्यमसुखंलोकंद्मंप्राप्य भजस्व माम् दृढव्रतम्।' या श्लोकाकरिता श्रीज्ञानराजांचे विवेचन मननीय वाटेल. फक्त या घरांतून (देहातून) बाहेर पडतांना अनायासाने बाहेर जाता यावे ही श्री. दादांची इच्छा देवाने पूर्ण केली हे भाग्य आहे. स्वपरदेहसंबंध अनेक जन्मांत आलेला असून तो ईशकृपेने आत्मसाक्षात्कार होईपर्यंत येत रहाणारच. तो त्रेपन्न वर्षाचा मर्यादित नाही. अहंता, ममता यामुळे तसे वाटते. घरांत सर्वच, आपापल्या पूर्व-कर्मांनुसार अतिथी म्हणून जमलेले असतात. स्वामी फक्त विश्वानिर्माणकर्ता परमात्माच आहे. म्हणून भरताप्रमाणे निर्मम, निरहंकार होऊन संसार (राज्य) करावा. दुर्योधनाप्रमाणे करु नये हे शिकविणेकरिता महर्षींनी रामायण, महाभारताची रचना केली. टी.व्ही.वर महाभारत दाखवितांना आधी सांगतात –

'कथा है पुरुषार्थकी, है स्वार्थकी, परमार्थकी' हे सांगून पुढे दाखवितात. हेच खरे ज्याच्या त्याच्या पूर्ववासनेप्रमाणे महर्षींचे सांगणे त्याला खरे कळून येणारे आहे. कोणाचेही शब्द हे ज्ञापक - ज्ञान करुन देणारे समजाऊन सांगणारेच असतात. ते कारक नसतात. कोणाकडून त्याप्रमाणे करवून घेऊ शकत नाहीत. ती शक्ती फक्त पूर्व सुकृतानुसार होणाऱ्या ईश्वराच्या प्रेरणेतच असते. या करिता 'किंबहुना सर्वसुखी। पूर्ण होवोनी तिन्ही लोकी । भजि जो आदिपुरुषी । अखंडीत' ही श्रीज्ञानराजांची मागणी आहे. आपण पूर्ण विवेकी, श्रवण मनन करणाऱ्या आहात. ईश्वराची, सद्गुरुंची आपणावर पूर्ण कृपा आहे. सत्पुत्र, सत्कन्या, सत्परिवार आपण पूर्वसुकृताने मिळविला आहे. इकडे लक्ष देऊन, अपरिहार्य घटना विसरुन जाऊन प्राप्त, अंगीकृत कर्तव्याकडे लक्ष द्यावे. श्रीगुरुमहाराज आपले चित्त तसे बनवोत, ही प्रार्थना.

❄ ❄ ❄

'अपराधसहस्त्राणि क्रियन्तेऽहर्निशं मया। दासोऽयामिति मां मत्वा क्षमस्व परमेश्वर' या प्रमाणे श्रीभगवंताची प्रार्थना नित्य श्रद्धेने, तळमळीने करीत राहाण्याने दुरितक्षय होऊन जाऊन, साधनाभ्यासांत उत्तम प्रगती, दैवीप्रकृती, परमशांती सर्व ईशकृपेने प्राप्त होऊ शकते. 'योगक्षेमं वहाम्यहम्' असे श्री भगवंताचे आश्वासनही आहे. संतांच्या ग्रंथांचे यथासमय वाचन करण्याचा प्रयत्न केल्यास योग्य मार्गदर्शनाचा लाभ मिळत राहून, उगीचच निराशा, पश्चाताप बंद होऊन, श्रद्धामूल आत्मविश्वास निर्माण होऊ शकतो. आयुष्यामध्ये सर्वकाळ बुद्धिदोषच असे समजण्याचे कारण नाही. प्राचीन दुष्कृताप्रमाणे प्राचीन सुकृतही असू शकते. त्यामुळे सत्संगती, परोपकारवृत्ती, एकमेका सहाय्य करु ही वृत्ती, इत्यादि गुणलाभही होत राहून त्यानें प्राचीन दुरितक्षय होऊन 'दुरिताचे तिमिर जावो ! विश्वस्वधर्मसूर्ये पाहो ! जो जें वांछील तो ते लाहो। प्राणिजात' असा माऊलीने दाखविलेला अहंकाररहित ईश्वराधिष्ठानमूलक आत्मविश्वास निर्माण होऊन निराशेचा पूर्ण लोप होऊ शकतो. 'मनी धरावे ते होते। विघ्न अवघेची नासोनि जातें। कृपा केलिया रघुनाथे। प्रचित येते' असे श्रीसमर्थही अनुभवाने नि:संदिग्ध सांगतात. श्रीभगवत्प्रार्थना वरीलप्रमाणे तळमळीने करीत राहाणे एव्हढेच साधकाचे काम आहे. त्याकरिता कालप्रतिक्षाही करावी लागेल. परमात्मा सर्वज्ञ सर्वशक्तिसंपन्न आहे ही भावना दृढ निर्माण होण्यासही बराच काळ जातो. ही निर्माणही ईशकृपेनेच होते आणि निराशेची धूळ तत्काळ दूर होऊन बुद्धी निर्मल होऊन शांत होऊ शकते. संतग्रंथांचे वाचन, चिंतनानें सर्व दिशा समजून येते. आपणही ईशभक्त आहात. ईशभक्तीच सर्व कल्याण साधणारी आहे. 'मत्तः सर्वप्रयतीते' या प्रमाणे सर्वकर्तृत्व परमात्म्याचेच आहे. अशी दृढबुद्धीच, 'बुद्धी दे रघुनायका' या प्रमाणे श्रीसमर्थ मागतात इत्यादि विचार करुन, नित्य भगवत्प्रार्थनेने निराशामुक्त व्हावे म्हणजे शांती लाभेल.

❄ ❄ ❄

प्रारब्ध व प्रयत्न दोघांची सांगड घालूनच प्रपंच व परमार्थ दोन्हीकडे यशाची सिद्धी करुन घ्यावी लागेल.

❄ ❄ ❄

'निश्चयाचे बळ। तुका म्हणे तेचि फळ' या संतांच्या मार्गदर्शनाचाही विचार करुन अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करावा. आम्हीही येथे श्रीमहाराजांचेजवळ प्रार्थना करीत आहोंत. त्यांचे कृपेने सर्व ठीक होईल. काळजीचे कारण नाही.

❄ ❄ ❄

होईल तितके ईशनामस्मरण घडावे अशी तेच तारक आहे.

❄ ❄ ❄

घरी सर्व हितैषी मंडळी असतांना निराशा घेऊन बसणे शोभणार नाही. 'दिगंबरा दिगंबरा....' या महामंत्राचा जप रोज २/३ माळा सवडीप्रमाणे चालू ठेऊन, अभ्यास लक्षपूर्वक चालू ठेवावा कोठे तरी मन गुंतविले पाहिजे. वडिलमंडळींचे मार्गदर्शनाप्रमाणे वागावे. कल्याण होईल.

❄ ❄ ❄

आपल्या पू.सौ.माताजीना उत्तम प्रशस्तिपत्रके, देवाच्या मूर्ती मिळाल्या हा जनता जनार्दनाकडून त्यांच्या ज्ञानदानाचा योग्य सत्कार झाला असे समजणेस हरकत नाहीं. कोणतेही काम, तन्मयतेने केले म्हणजे समाज आदर करतोच. या बद्दल आपल्या पू.सौ. माताजींना धन्यवाद.

❄ ❄ ❄

सत्संगतीनें साद्विचारच मनांत स्थिर राहून स्थिरशांती मिळू शकते. ईशेच्छेवर सर्व अवलंबून आहे.

❄ ❄ ❄

श्री.......ची कार्यपद्धत्ती, व्याप तितका संताप या सदरांत बसणारी नाही. कारण 'सर्वेपि सुखिनः सन्तु' ही धारणा ठेऊन ते सतत कार्यरत असल्यानें, अनेकांचे जीवनांत सुखाचा काल आणण्याचे श्रेय ईशकृपेने त्यांना मिळविता येते.

कार्य हें व्यक्तिकडून होत असलेले दिसले तरी समाष्टीबुद्धीच ग्राहकरुपाने, सहाय्यक रुपाने कार्य यशस्वी करणारी आहे. तीच परमात्मस्वरुप आहे. तिच्या अंतर्गतच आपण आहोत याची जाणीव ठेऊन समष्टीबुद्धीशी एकरुपही होऊ शकणारी व्यष्टीबुद्धी; 'मनी धरावे तें होते। विघ्न अवघेची नासोनि जाते। कृपा केलिया रघुनाथे। प्रचीत येते' असे श्रीसमर्थानी सांगितल्याप्रमाणे ईशशक्तीचेच सर्व कर्तृत्व जाणून पूर्ण शांती मिळू शकते.

'थोडाही गुण मिळता घ्यावा' हे खऱ्या गुणदर्शनाचे फल आहे. यथार्थ गुणदर्शन, गुणग्राहकता हा ही श्रेष्ठ गुण आपल्याजवळ ईशदत्त आहे. यामुळे आपले मानसिक असमाधान असल्यास तें सहज दूर होईल. कांही व्याधीरुपाने शारीरिक असमाधान असेल तर तेही डॉ......... यांच्यासारख्या नामवंत तज्ञांच्या उपचाराने दूर होईल.

❊ ❊ ❊

आपण नियमाने बैठकीचा अभ्यास चालू ठेवावा. श्रीराममंत्राचा जप, प्रार्थना करुन साधनेस बसावें व जितकी तटस्थ वृत्ती ठेवता येईल तितकी ठेवावी. बाकी सर्व ठीक होईल.

❊ ❊ ❊

भगवंताचे नामस्मरणाकडे व कर्तव्याकडे लक्ष देऊन रहावें. राममंत्राचा जप झाला तरी होऊ दे. परमात्मा एकच आहे. सर्व नाम व रुपे त्याचीच आहेत अशी भावना ठेऊन विकल्प सोडावा.

❊ ❊ ❊

साधकांचे लक्ष मुख्यत: साधनेकडेच नित्य असले पाहिजे. ध्येयसिद्धि ही ईशक्तीच्या आधीन आहे. परमात्मा पूर्ण दयाळू व सर्वज्ञ आहे. तो योग्य वेळी साधकाला कृतार्थ करतोच. यात संशय नसावा. कोणी संतमहात्मे भेटलेच तर त्यांचेबद्दलही अनादर नसावा. आपणांस प्राप्त झालेली साधना सांभाळून फावलेल्या वेळांत त्यांनी सांगितल्याप्रमाणे नामस्मरण करणेस काही हरकत

नाहीं. परमात्मा एकच आहे. सर्व मंत्र त्याचेच आहेत. पण त्याबद्दल कोणा तरी योग्य सज्जनांशी विचारविनिमय करुन त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे करीत जावें. कळावे.

❋ ❋ ❋

'सत्कर्मयोगे वय घालवावे' या श्रीसमर्थांच्या आदेशाप्रमाणे आपली सर्वांची वृत्ती असल्याने अवश्य ईश कृपा आहे. ईश्वर प्रार्थना श्रद्धेने करीत रहाणे एवढेच आपले कर्तव्य आहे. संसार देवाचाच आहे. तोच भयकृत, भयनाशक असल्याने सर्वांचे रक्षण करणारा समर्थ आहे, हा विश्वास ठेऊन प्रार्थना करीत रहावे. जपही अधिकाधिक होईल तितका चालू ठेवावा.

❋ ❋ ❋

नवचंडीचा कार्यक्रम चार दिवस आपल्या घरी होत आहे. सत्कर्म आहे. कल्याण होईल. ईशकृपेने हे सत्कर्म निर्विघ्न व्यवस्थित पार पडावे या बद्दल ईश्वराजवळ प्रार्थना आहे. आपल्या सौ. सूनबाईंचेही पत्र आले आहे. 'दिगंबरा दिगंबरा...' या महामंत्राचा जप सवालक्ष सर्वांनी मिळून केला म्हणजे पूर्ण होईल. सवडीने पूर्ण झाला तरी चालेल. याने ईश्वरकृपेने कल्याण होईल. दुरितक्षय होऊन प्रतिकूल प्रारब्ध असेल तर त्याचाही क्षय होऊन जाईल. काळजीचे कारण नाही.

सौ......ताईंचाही काही ज्योतिषाचा अभ्यास चालू असलेचे समजते. केवळ पुस्तकावरुन कांही तरी नुसते वाचून मनावर परिणाम करुन घेऊ नये. ईश्वर प्रार्थनेनेच सर्व कल्याण सहज होते हे लक्षात घेऊन रहावे.

❋ ❋ ❋

'...........' या मंत्राचा जप रोज सवडीप्रमाणे दहामाळा करणेस सौ..... देवीस सांगावे. अधिक वेळ मिळाल्यास अधिकही करणेस हरकत नाही. ईशकृपेने मनाला शांती मिळून कार्यसिद्धीही होईल. —– प्रमाणे आपण अयोग्य वागणाऱ्या मुलाबद्दलही कडक वागू शकत नाही.

कोणाचाही स्वभाव बदलणे कठीण आहे. देवावर भार घालून प्रपंचाकडे आपणासच लक्ष देणे भाग आहे. अजून मुलींची शिक्षणे, विवाह ही जबाबदारी सांभाळावयाचे प्रारब्ध आहे. बरोबरीने कार्य करुन धीर देणारा कोणीही नाही असे समजून देवाचेच पाय धरणे भाग आहे. ईशेच्छा.

❄ ❄ ❄

प्रपंचात चढ उतार असतोच. प्रयत्न ईशस्मरणपूर्वक चालू ठेवला म्हणजे झाले. साधना-भ्यासही प्रार्थनापूर्वक नित्य चालू असावा. कल्याणाचा मार्ग आहे.

❄ ❄ ❄

द्वंद्वात्मक संसाराचे सुख व दु :खही येते व जाते. ईश्वरचरित्रे, संतांची चरित्रे यांचे वाचन, चिंतन सवडीने करीत राहाण्यातच शांती समाधान मिळू शकते. साधनाभ्यास ही सवडीप्रमाणे चालू ठेवावा. ईशकृपेने शांती लाभेल. ........... चा स्वभाव विचारी असल्याने समाधान मिळविता येईल. सर्वांचे कल्याणाकरिता ईश्वरस्मरणपूर्वक कर्तव्य कर्म करीत राहाणे हीच ईश्वरसेवा आहे. इतरांचे सुखदु :ख त्यांच्या पूर्व कर्मावर अवलंबून असते. व्यर्थ चिंता करीत राहून काय उपयोग ? आपणांस रात्रीच्या साधनाभ्यासाने झोप कमी मिळते त्याचाही त्रास होतो व प्रकृतीवर परिणाम होतो. दिवसा अभ्यास जमल्यास करावा. विश्रांती मिळेल. श्री रामनवमीच्या उत्सवात आपण रामचरित्रावर विवेचन करणेचे ठरविले हे चांगले आहे. त्यात काळ चांगला समाधानकारक जाऊन शांती मिळेल.

❄ ❄ ❄

ईश्वरकृपेने सर्व कल्याण होईल. काळजीचे कारण नाही. ईश्वरावर भर टाकून सर्व संसार ईश्वराचाच आहे अशा बुद्धीने राहून प्राप्तकर्तव्याकडे लक्ष द्यावयाचे आहे. चि. ...... च्या विवाहाचे, नोकरीचे लवकर व्यवस्थित ठरले म्हणजे चिंता राहाणार नाही. या वयात साममार्गाचाच अवलंब केला

पाहिजे. पूर्वीपासून तोच आहे.

'.............' या मंत्राचा जप सवडीप्रमाणे सौ. ....... ताईंनी रोज तीन माळा श्रद्धेने चालू करावा. अनुकूलता लाभेल. ईश्वरप्रार्थना नित्य असावी.

❄ ❄ ❄

कर्मभोग सर्वांनाच अपरिहार्य आहे तो ईश्वर प्रार्थनेने, नामस्मरणाने संपून जातो. सुख-दु:ख द्वंद्वात्मक प्रपंच आहे. द्वंद्वातीत अवस्था मिळणेकरताच देवांची प्रार्थना तळमळीने करीत राहाणे श्रेयस्कर आहे.

❄ ❄ ❄

**श्रीसमर्थांचे आदेशाप्रमाणे श्रीराम त्रयोदशाक्षरी मंत्राचा जपही यथाशक्ती एखादी माळ तरी चालू केल्यास आपत्तीचा परिहार होऊन शांती लाभ होईल.**

कोर्टाच्या कालहरणापेक्षा साममार्गाने आपसांत तडजोड होण्याने चित्तक्षोभ घडणार नाही. उभयबाजूंचे वकील दोन्हीही वादी प्रतिवादी यांनी साममार्गानेच निर्णय घेण्याचे प्रथम निश्चित करुन विचारास आरंभ केला पाहिजे. कूळ कायद्याप्रमाणे सध्या जमीन घरीच करावी लागेल. त्याकरिताही प्रामाणिक शेतकरी मिळविणे आवश्यक आहे. तडजोड म्हणजे थोडी नफा नुकसान राहणारच. पण आपल्याच घरांत ती राहील. कोर्टाकरिता खर्च झाल्यास ती उभयपक्षानाही राहाणार नाही हा ही विचार करुन न्याय मार्गाने, चित्तशांती कायम ठेऊन निर्णय होणे योग्य ठरेल. आपण या विषयांचे जाणते आहात, विचार व्हावा.

❄ ❄ ❄

चि............. ने आपले दोघांचे ऐकून योग्य ध्येय ठरविले तर त्याचेच हित साधणारे आहे. नोकरीत पराधीनता आहे. घरचा व्यवसाय स्वतंत्र आहे. हितैषीमंडळींचे म्हणणेही विचारणीय असते. असो. शेती विक्रीचा विचार व्यवहारज्ञ मंडळींचे विचारे ठरवावा. योग्य किंमत आली पाहिजे. ब्राह्मणवर्गाला

शेती करणे अवघड आहे. रोख पैसा प्रपंचातील कार्यामध्ये खर्च करावा लागतो. शेताचाही बराच पैसा आल्यावर तो कोठे तरी ठेऊन ते व्याज घरबसल्या मिळते. त्रास काही पडत नाही. पूर्ण विचार करुन योग्य ते ठरवावे.

❄ ❄ ❄

आपले चिरंजीव व सौ. सूनबाई येथे आश्रमांत काल भेटल्या. दोघांनाही मनस्ताप व पश्चाताप झाल्याचे दिसले. आपण वडिल मंडळींनी त्यांना क्षमा करुन सांभाळून घ्यावे. अन्यत्र रहाण्याचे ठरल्यास हरकत नाही. शरीराने अन्यत्र राहावे लागले तरी मनाने एकरुप, अनुकूल राहून व्यवहार करणे हितावह ठरेल असे वाटते. त्यांच्या बरोबरच हे पत्र देत आहे. क्षमा करणे हे वडिल माणसांचे कर्तव्य आहे. त्या दोघांनाही समजाऊन सांगितले आहे. त्यांनीही यापुढे संयमाने सहनशीलतेने राहिले पाहिजे. तेच त्यांचे कर्तव्य आहे. व ते त्यांच्या हिताचे ठरणारे आहे. यापेक्षा अधिक काय लिहावे ? सर्वांनीच संयमाने, वाणीचा निग्रह ठेऊन प्रपंच, परमार्थ सुखाचा करावा अशी सर्वांतर्यामी श्रीपरमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

❄ ❄ ❄

'............' या मंत्राचा जप नित्य ईश्वर प्रार्थनापूर्वक श्रद्धेने तीन माळा सवडीप्रमाणे सौ..... ताईंनी सुरु करावा. मुलींनीही अभ्यास सांभाळून करणेस हरकत नाही. ईशकृपेने सर्व ठीक होईल. काळजीचे कारण नाही. आपण इकडे येणेचा प्रवासाचा त्रास घेऊ नये. पुढें आमचे येणे तेथे झाल्यावर भेट होईल.

❄ ❄ ❄

देवाची प्रार्थना, नामस्मरण नित्य श्रद्धाभक्तीने करावे म्हणजे ईश्वरकृपेने मनास शांती मिळते. तेथे श्री.... शास्त्री, ........, या मंडळींचा परिचय श्री.... यांना आहेच, आपलेही उपाध्याय आहेतच. सर्वांचे विचारे मार्जारहत्येचा दोष दूर होणेकरिता योग्य.

❄ ❄ ❄

६ ते १४ एप्रिल पर्यंत नरसोबावाडीस श्रीनारायणस्वामींच्या पुण्यतिथी उत्सवास जाऊन १६ तारखेस सकाळी आम्ही येथे परत येऊ. येथे त्या दिवशी कोर्टाची तारीख आहे. सध्या कोर्टाच्याच चक्रव्यूहात सापडण्याचा प्रारब्धभोग सुरु आहे. तो ईशदयेने संपून जाईल. आपणासारखी विधीज्ञमंडळी आत्मीयतेने प्रयत्नशील आहेत. आपण इकडे मुद्दाम येणेचे श्रम घेऊ नये.

❄ ❄ ❄

आपण शांतपणे सवडीने साधनाभ्यास करावा. ईश्वर प्रार्थना, जप, नामस्मरण, संतांच्या ग्रंथांचे सवडीने वाचन करावे. ईश्वरकृपेने हळू हळू प्रगती होईल. काळजी नसावी.

❄ ❄ ❄

श्री..... वकील हे कोर्टात काम पहाणेस जातात हे समजून संतोष झाला. त्यांना या कार्यात घरीच मार्गदर्शन पुष्कळ मिळेल व इतरांकडूनही मिळेल. तेही स्वत: बुद्धिमान व निश्चयी स्वभावाचे आहेत. त्यांनी पूर्ण लक्ष दिल्यास या व्यवसायांत ते उत्तम यशस्वी होतील अशी खात्री वाटते. म्हणजे आर्थिकबाबही उत्तम सुधारुन प्रपंचही चांगला वाढीस लागून सर्वांनाच समाधान लाभेल. ईश्वरकृपेने सर्व घडून येईल. काळजीचे कारण नाही.

❄ ❄ ❄

आपण ईश्वर प्रार्थना, नामस्मरण, श्रद्धेने, तळमळीने चालू ठेवावे. देवावर भार घालून उपासना चालवावी. सर्व प्रतिबंध दूर होऊन ईशकृपेने कल्याण होईल. काळजी नसावी. वेळेवर औषध घेऊन विश्रांती घ्यावी. कोणाचीही चिंता करु नये. सर्व कल्याण ईशकृपेनेच होणार आहे. उगीच काळजी करु नये. 'सर्वेपि सुखिन: संतु' ही ईशप्रार्थना चालू ठेवावी.

❄ ❄ ❄

पूर्ण विश्रांती व प्रकृती निर्दोष होइपर्यंत डॉक्टरांचे सांगणेप्रमाणे औषधोपचार चालू ठेवावा. ईश्वरकृपेने आरोग्यलाभ होईल. ईश नामस्मरणाकडे

चित्त लावण्याचा प्रयत्न करावा. संसारिक गोष्टीचा अधिक विचार करीत राहिल्यास अशांती उत्पन्न होऊन प्रकृतीवर परिणाम होणार आणि मुलामुलींबद्दल विचार करुन काय होणार? रामकृष्णादिकांनी मातापितरांची आज्ञापालन करण्याचा आदर्श समोर ठेवला असून त्यांच्याच देशांत जन्म घेऊन आम्हाला मातापितरांच्याबद्दल कृतज्ञतासुद्धा व्यक्त करता येत नाही. मग त्यांच्याकरिता कष्ट सोसून त्यांना सुखी करण्याचे पुण्य मिळविणे तर दूरच राहिले. पूर्व सुकृताशिवाय मातापितरांच्याबद्दल कृतज्ञ स्वभाव मिळत नाही. त्यांच्या सारखे खरे हितैषी मुलांचे कोणीच नसते. पण ही कृतज्ञता सुखलोलुपतेमुळे मुलांची दिसत नाही. उलट कर्तव्य त्याग करीत राहून कृतघ्नतेचे पापच पदरांत पडते. व त्याचे फल यमयातनेशिवाय काय मिळणार? हा सर्व विचार करुन **'कोणीही कोणाचे नाही' ही उदासीनदृष्टी ठेऊन नामस्मरण अखंड चालवावे.**

❄ ❄ ❄

श्री. ...... चे प्रथमवयांतील कष्टमय जीवन असूनही, पुढे विद्याभ्यासकरुन उत्कर्ष संपादन केल्याचे समजून समाधान वाटले. जन्मकाळी प्रारब्ध कसेही असले तरी पौरुषप्रयत्नाने उत्कर्ष मिळविता येतो. संकट परिहार करता येतो. याचा आदर्श हे चरित्र आहे. आता तर त्यांची बुद्धी अनुभवाने परिपक्व, संकटक्षय, विवेकप्रधान बनलेली असल्याने व आपल्या तितीक्षाक्षम बुद्धीचे त्यांना अत्यंत आत्मियतेचे सहाय्य असल्याने, प्रपंचातील प्रतिकूल परिस्थिती ओलांडून पलीकडे जाण्याचे त्यांच्या बुद्धीत सामर्थ्य आहे असे असता प्राप्त परिस्थितीचा त्यांचे मनांवर परिणाम कां झाला? हे समजत नाही. पक्षकाराची बुद्धी एखादेवेळी गोंधळून जाणे शक्य आहे. पण योग्य मार्गदर्शन करुन त्याच्या पदरांत फल टाकणारी वकीलांची बुद्धी धीरगंभीर असते, त्याशिवाय कार्य होणार नाही. शिवाय आपल्या दोघांच्या मनात धर्म भावना, ईश्वर श्रद्धा, सन्मार्गरुचि इत्यादि सद्गुण संपत्तीही सहाय्यक आहेच. निष्कारण इतराने उत्पन्न केलेली प्रतिकूल परिस्थिती, ईशकृपेने दूर होऊ शकते. 'न मेभक्तः प्रणश्यति' असे श्रीभगवंताचे आश्वासनच आहे. इत्यादि विचार शांतीदायक होतील.

❄ ❄ ❄

घरी राहून संतांचे ग्रंथ वाचूनच आपणांस चित्त स्वास्थ व शरीर स्वास्थही लाभेल. एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, हरिवरदा (श्रीकृष्ण चरित्र) भक्तविजय, इत्यादि संतांनी सर्वजनांच्या हिताकरिता लिहिलेले ग्रंथ श्रद्धेने, शांतपणाने रोज काही वेळ वाचीत राहिल्यास योग्य मार्गदर्शनही मिळत राहील. ईशकृपेने चित्तशांतीही मिळेल. संतानी अनुभवलेला हाच मार्ग आहे. ईश्वर नामस्मरणही दुरितक्षयपूर्वक शांतीदायक आहे असा सत्पुरुषांचा अनुभव आहे. केवळ अनुकूल, प्रतिकूल मानसिक विचार, मनोराज्य अशांती वाढविणारेच आहे. 'जेवी हिरेनी हिरा चिरीजे। तेवी मनोचि मन धरिजे'। असे श्रीनाथ महाराज सांगतात. आपल्या घरी श्री.... चाही शांत सहवास आपणास लाभला आहे. 'एकामेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ' या आदेशाप्रमाणे मनोवृत्ती बनविण्याचा प्रयत्न केल्यास प्रपंच, परमार्थ सुखाचा बनविता येतो. विचार करावा. मुलांच्या परिक्षा होऊन पुढील योग्य अभ्यास सुरु होत आहे ही ईश्वरकृपा आहे.

आपल्या मंडळींचीही विचारपद्धती समजून आली. तेथे त्यांना बाहेर सामाजिक कार्य करणेस अवसर मिळतो. बाहेरही त्यांना मार्गदर्शन करता येते. घरांतही तसेंच करता येणे शक्य आहे. स्वतःचे मनावर, फलसिद्धीचा किंवा असिद्धीचा परिणाम करुन न घेता बाहेर मार्गदर्शन सर्व करतात. तसेच घरांतही अलिप्तवृत्तीने करीत राहिल्यास मनाची शांती ढळण्याचे कारण रहाणार नाही. हाच अभ्यास प्रपंचात करीत राहून प्रपंचच परमार्थरुप संतांनी करुन दाखविला. संतांचे चरित्र वाचनाने त्यांचे प्रयत्न आपणास कळून येऊन प्रयत्न करता येतो. तो सफल होणेस ईश्वर प्रार्थना, नामस्मरण इत्यादि उपायही संतचरित्रावरुन समजून येतात. असो.

❄ ❄ ❄

योग्य प्रवचन श्रवणाने आपली योग्य सिद्धान्ताबद्दल असणारी जिज्ञासा पूर्ण होऊ शकते. श्रवणाचे मनन मात्र झाले पाहिजे. परोपकार प्रवृत्ती व परपीडा निवृत्ती हाच परमार्थ आहे. आत्मनिरीक्षणाने हे साध्य होते. याचा अर्थ, स्वीय परिवाराकडे अगदी लक्ष देऊ नये असा घेऊ नये. सर्व सृष्टी परमेश्वराची आहे

या भावनेने स्वीय परिवारा कडेही आवश्यकतेप्रमाणे योग्य तितके लक्ष ठेऊन वागणे हा ही परमार्थ असून याने अलिप्ततेचा अभ्यासही होत राहातो. 'हेची थोर भक्ति आवडते देवा। संकल्पाची माया संसाराची' असे श्रीतुकाराम महाराज सांगतात. अन्न, वस्त्र व योग्य मार्गदर्शन, एवढीच फक्त जबाबदारी कुटुंब प्रमुखाची आहे. असेच वर्तन, यथाशक्ति समाजाबद्दल ठेवणे हीच समाजरुप परमेश्वराची सेवा आहे. विचार व्हावा.

❄ ❄ ❄

प्रपंचात अनेक मंडळी आपापली प्रारब्धे घेऊन जमलेली असतात. त्यामुळे केव्हा अनुकूलता तर केव्हा प्रतिकूलताही उद्‌भवते. अशा वेळी ईश्वरस्मरणपूर्वक तटस्थता, उपेक्षाबुद्धीचा अभ्यास ठेवल्यास मानसिक स्वास्थ टिकण्यांस मदत होते. या शिवाय गत्यंतर नाही. अनेक चिंता प्रपंचामध्ये सतत येत असतात. अशा वेळी निराश न होता ईशस्मरणपूर्वक त्यातून मोकळे होण्याचा प्रयत्न करीत रहाणे हेच समाधानाचे साधन आहे.

❄ ❄ ❄

कु ...... चे लॉ कॉलेजही सुरु होणार. विवाह प्रयत्नही हस्तपरहस्ते चालू ठेवावेत. योग आल्यास न थांबता प्रथम ते कार्य करुन मोकळे होणे चांगले. शिक्षणाचा विचार नंतर करता येईल. एकेक चिंतेतून मोकळे होणे चांगले. मनावर परिणाम करुन न घेता प्राप्त कर्तव्य ईशस्मरणपूर्वक करीत राहाण्यानेच शांती मिळते.

❄ ❄ ❄

सवडीप्रमाणे साधनाभ्यास करावा. जपही सर्वांनी मिळून चालू ठेवावा. अमुक इतक्या दिवसांतच जपसंख्या सवालक्ष पूर्ण झाली पाहिजे असे नाही. नित्य ईश्वरप्रार्थना जप चालू असला म्हणजे झाले. ईश्वरकृपेने शांतता समाधान लाभते. अजून एक मुलीचे लग्नाची जबाबदारी आपणावर आहे हे सौ..... ताईंचे सांगणे योग्य आहे. ते आपण मान्य करुन सध्या घरी राहूनच प्राप्तकर्तव्य

करावे. चिरंजीवांनाही मार्गदर्शन होत राहून आपल्या अनुभवाचा फायदा होईल. विचार करावा.

❄ ❄ ❄

मुलीच्या विवाहाबद्दल ईश्वरप्रार्थनापूर्वक प्रयत्न चालू ठेवावा. ईशकृपेने चिंता दूर होईल. थोडा वेळ लागला तरी गडबड उपयोगी नाही. जन्माचा संबंध आहे. पूर्ण विचारानेच सर्व केले पाहिजे. हे सौ..... ताईंना सांगावे. त्यांनीही ईशप्रार्थना, दिगंबरा महामंत्राचा जप यथाशक्ती चालू ठेवावा. ईश्वरकृपेने कायसिद्धी होईल.

❄ ❄ ❄

पुत्रकर्तव्य लक्षात ठेऊन वडिल मंडळींची सेवा करणाऱ्यांचे पूर्ण कल्याण ईशकृपेने होते. काळजीचे कारण नाही.

❄ ❄ ❄

आपणांस ईशकृपेने त्या क्षेत्राला राहाण्याचा व ईशसेवा करणेचा योग आला हे आपले पूर्वसुकृत आहे यांत संशय नाही. कामही ईश्वराचेचे जीर्णोद्धाराचे पाहाण्याचा सुयोग मिळाला त्याचे ज्ञानही आपण अभ्यास करुन मिळविले आहे. त्याचा सदुपयोग झाला. श्री पिताजींनाही सहाय्य करण्याचे श्रेय लाभले. ही सर्व ईशकृपा आहे. मानव जीवनात काया, वाचा, मनाने होईल तितकी ईशसेवा करीत राहून जीवन सफल करावयाचे आहे. ईशप्रार्थनेने ते सर्व घडेल.

❄ ❄ ❄

श्री........... ना मृत्यू शिवक्षेत्रात, महाशिवरात्रीचे दिवशी शिवसानिध्यात आल्याने श्रीशंकराचे कृपेने ते कैलासलोकात श्री शिवसन्निध निश्चित जाऊन राहिले आहेत. मानव जन्माचे सार्थक झाले.

❄ ❄ ❄

आपण लिहीलेली 'सर्व इंद्रिये आणि मन हे ......' ही प्रार्थना थोरल्या महाराजांनी सर्वांना मार्गदर्शक केली आहे. ती आपण चालू ठेवावी. परमात्म्याचे एक नाव 'हृषीकेश' असे आहे. हृषीक म्हणजे इंद्रिये यांचा ईश म्हणजे नियंत्रण करणारा. भक्तांच्या सर्व इंद्रियांचे नियमन करणारा ईश्वर आहे. हा अर्थ वरील प्रार्थनेत आहे. ती ईश्वरशक्ती लक्षात आणून रोज प्रार्थना करीत असावे. कल्याण होईल.

❋ ❋ ❋

चांगल्या विद्यालयांत प्रवेश मिळून, ईश्वरकृपेने जोडीदार हा चांगला मिळाला. आता, ईश्वरप्रार्थनापूर्वक अभ्यासाकडे पूर्ण लक्ष देऊन, त्यात उन्नती साधणे व मंडळींचे समाधान साधणे, एवढेच आपले कर्तव्य आहे. तथापि विचाराने, धैर्याने, गुरुजनांच्या मार्गदर्शनाने, श्रेष्ठ पुरुषांच्या ग्रंथवाचनाने लक्षपूर्वक अभ्यास करीत राहून ज्ञानार्जन उत्तम करणे हे विद्यार्थी दशेतील मुख्य कर्तव्य आहे. हे लक्षात ठेऊन अभ्यास करावा. '........' या महामंत्राचा जप रोज सवडीनुसार चालू ठेवावा. ध्यानाचाही अभ्यास, काही समय निर्विचार स्थिती, शांती, उत्साह या करीता थोडा चालू ठेवावा. वाडवडिलांच्या पुण्याईने, ईश्वरश्रद्धेने आणि अभ्यासशील राहिल्याने आपली उन्नती ईशकृपेने निश्चित होईल. काळजी नसावी.

❋ ❋ ❋

आपली सर्वांची काशीयात्रा श्रीविश्वेश्वरकृपेने निर्विघ्न व्यवस्थित पार पडली. हे आपले पूर्वसुकृत व श्रद्धा भावनेचे फल आहे. यात्रेत आम्हालाही आपले उत्तम सहाय्य झाले.

तुर्त आम्ही ग्रहदशा, दैव यामुळे या जागेच्या संकटात सांपडलो आहोत. श्री ....... वकीलांचे सहाय्य ईशगुरुकृपेने लाभलेले आहे. प्रतिपक्षांनी आमच्यावर फौजदारी केली आहे. असत्याचा आणि कृतघ्नतेचा कळस होत चालला आहे. अशा वेळी आपणासारख्या सात्विक सज्जनांच्या आत्मियतेचाच आम्हाला आधार आहे. ईशेच्छेनुसार जे घडेल ते खरे 'आलिया भोगासी असावे सादर।

देवावर भार घालूनिया' या संतांच्या वचनाप्रमाणे आम्ही स्वस्थ राहणेचा प्रयत्न करीत आहोत. सात दिवस श्रीगुरुंच्या चरित्राचे चिंतन होऊन शांती मिळेल.

❄ ❄ ❄

आपले श्रद्धा, भक्तिपूर्ण पत्र वाचून समाधान वाटले. आपला सत्य संकल्प देवाने पूर्ण केला ही खरी ईश्वरकृपा आहे. ठरल्याप्रमाणे श्रावणमासात २१ तास भजन, श्रीहरेश्वरास सहस्त्र बिल्वार्पण, प्रसाद ग्रहण सर्व आपल्या इच्छेप्रमाणे उत्तम व्यवस्थित पार पडले. आपली व सर्व सहकारी मंडळी यांची पुण्यकर्म निष्ठाच याला कारण आहे. तसेच श्री .... च्या आजाराचेवेळी आपण थांबून त्यांची शुश्रूषा केली. ठरलेले पुण्य कर्मास अडथळा झाला असे न समजता व आग्रह न धरता, आर्तत्राण हे प्राप्त कर्तव्य समजून ते केले या मोठ्या पुण्याने आपले पूर्वसंकल्पित हरेश्वरचेही पुण्यकर्म आपणाकडून करुन घेऊन तेही समाधान आपणांस मिळवून दिले असे समजण्यास हरकत नाही. परमार्थ हा मुख्य मनोवृत्तीवर अवलंबून आहे. पुण्यकर्म करण्याची बुद्धीही ईश्वरप्रेरणेनेच झाली. त्याप्रमाणे फलसिद्धी हे ईशशक्तीचेच कार्य आहे. अशी मनोवृत्ती प्रत्येक कार्याचे वेळी असल्यास, मनातील आग्रहादि विकार दूर होऊन शांती लाभते. अशा शांत स्थितीत जे कर्म घडेल तेच पुण्योत्पादक ठरते. आग्रहाने घडलेले कार्य तितके उच्च ठरणार नाही. श्रीरामेश्वराला अभिषेक करण्याकरिता आणलेल्या गंगेच्या कावडीतील पाणी मध्येच भेटलेल्या तहानेल्या गाढवाला श्रीनाथमहाराजांनी पिण्यास दिले आणि त्यांची मनोवृत्ती त्यावेळी शांत राहिली. श्रीरामेश्वराला अभिषेक न झाल्याने त्यांना खेद झाला नाही. हाच कर्मयोग व भक्तियोग यांचा समन्वय आहे. 'ठेविले अनंते तैसेची रहावे। चित्ती असो द्यावे समाधान' हे परमार्थाचे मुख्य सूत्र आहे.

❄ ❄ ❄

काशीकडे त्यावेळी उन्हाळा असल्यामुळे लहानमुलांनी, अशक्त माणसांनी इतक्या लांब यावे की नाही याचा विचार करुन सर्व ठरवावे. बायका कोणी बरोबर येत असल्यास, मासिक अस्पर्शतेचा काल मध्ये येणार नाही,

त्यानीच येणे हितावह होईल. नाहीतर मध्ये वेळ मोडेल. इत्यादि सर्व विचार करुन योग्य ते ठरवावे.

❋ ❋ ❋

श्री मातोश्रींची प्रकृती बरी नसल्याबद्दल व उपचार चालू असले बद्दल आपले व सौ. .... ताईंचे पत्र मिळाले. ईश्वर प्रार्थनापूर्वक आपले सेवा कर्तव्य चालू आहे. कर्मभोग सर्वांनाच अपरिहार्य आहे. ईशकृपेने सत्पुत्र कर्तव्य आपण करीत आहात यातच आपले कल्याण आहे. ईश्वरेच्छेनेच सर्व घटना घडून येतात. प्राप्तकर्तव्याकडे आपण लक्ष देऊन रहाणे एवढेच जीवाला करता येते. ईशस्मरण करीत शांतचित्ताने रहावे.

❋ ❋ ❋

आपणाकडून धनाचे सहाय्य तर आम्हाला नेहमी चालूच आहे. धनापेक्षा मनाचे सहाय्य महत्वाचे आहे ते ही आपले आहेच त्याचीच यापुढे विशेष जरुरी आहे.

❋ ❋ ❋

संध्याकाळी रोज २५ ते १ तारखेपर्यंत ६ ते ९ भागवतार्थ कथनाचे कार्यही आमच्याकडे त्यांनी दिलेले आहे. पण ते अंगभूत असून मुख्य कार्य श्रीवामन निवासाचे आहे आणि ते अनंत हस्त परमात्म्याच्या असीम कृपेनेच पूर्णतेस जाणारे आहे.

शांतचित्त, मधुर वाणी, नम्रता ही ही पारमार्थिक साधने आपले ठिकाणी आहेत. त्याही साधनांचा अभ्यास, स्वत:च्या साधनाभ्यासाबरोबर जीवनांत ठेवला पाहिजे. परमात्मा सर्व करवून घेतो. काळजीचे कारण नाही.

❋ ❋ ❋

साधनाभ्यास, अभ्यास सांभाळून सवडीप्रमाणे चालू ठेवावा. कल्याणाचा मार्ग आहे. कॉलेजचा अभ्यासही दक्षतेने, नियमाने, उत्साहाने नित्य चालू

ठेवावा. तुमचा अभ्यास लवकर, व्यवस्थित आटोपून तुम्ही पदवीधर झाला म्हणजे तुमच्या श्री पिताजींनाही आनंद होऊन त्यांना तुमचे सहाय्यही लाभेल. सर्व चिंता दूर होतील. ईश्वर प्रार्थना नित्य चालू ठेवावी. ईश्वरकृपेने सर्व ठीक होईल. चिंता नसावी.

❄ ❄ ❄

साधनाभ्यास प्रार्थनापूर्वक सवडीने चालू ठेवावा. कल्याणाचा मार्ग आहे. त्यावेळी जे जे होईल ते सर्व ईशशक्तीचेच कर्तृत्व आहे. आपले जीवांचे काहीच कर्तृत्व नाही. ही अशी तटस्थ भावना, समर्पण भावना ठेवावी. आवश्यक ते व्यवहार सांभाळूनच सर्व करावे लागेल. नाईलाज आहे. आता उन्हाळयाच्या सुट्टीत घरी जाणार असालच तेथेही वडिल मंडळींना समाधान होईल. सर्वांच्या अविरोधाने जे करणे ते करावे. ईश्वर प्रार्थना नित्य चालू ठेवावी. ईशकृपेने सर्व ठीक होईल.

❄ ❄ ❄

मनामध्ये सात्विक विचाराप्रमाणे, राजस, तामसही विचार येणारच. पण तेही निघून जातात. ते समूळ जाणे करिता ईश्वरभक्ती हेच मुख्य साधन असल्याचे संतमहात्मे अनुभवाने सांगतात. हा विचार करुन, काल्पनिक किंवा नैसर्गिक दोषांचे परिमार्जन होणेसाठी '............' या महामंत्राचा जप सवडीने १/२ माळा रोज चालू ठेवावा. परमात्मा दयासागर, सर्वज्ञ, सर्व शक्तिसंपन्न आहे हा पूर्ण विश्वास ठेऊन प्राप्त कर्तव्याकडे लक्ष द्यावे. ईशकृपेने सर्व ठिक होईल. काळजीचे कारण नाही.

निराशा सोडून अभ्यासाकडे पूर्ण लक्ष द्यावे. कळावे.

❄ ❄ ❄

स्वामींचे दर्शन, भोजन आपल्या घरी झाले हा चांगला योग आला. 'अतिथीदेवो भव' ही ही एक उपासना गृहस्थाश्रमी माणसांना घडते. ती करण्याची बुद्धी, आपल्या मंडळींना ईश्वरकृपेने मिळाली आहे. सद्भावनाच सर्व कल्याण करणारी आहे.

❄ ❄ ❄

आपण प्रकृतीस सांभाळून असावे. चांगले औषध व पूर्ण विश्रांती घ्यावी. पावसाची हवा आहे. जपून असावे. १/२ दिवस स्नान करु नये. भस्मस्नान चालते.

प्रपंच साधून परमार्थाकडेही आपले लक्ष असल्याचे पाहून समाधान वाटते. हे पूर्वसुकृत व ईश्वरकृपा आहे.

❄ ❄ ❄

आयुष्मान बटुनी आता रोज संध्या व गायत्रीमंत्र जप करणे आवश्यक आहे. याने बुद्धी विकास होऊन दुरितक्षय, कल्याण होईल.

❄ ❄ ❄

आपली संकल्पाप्रमाणे श्रीगुरुचरित्र सात सप्ताह पारायण सेवा श्रीप्रभुकृपेने पार पडली असेलच. शुद्ध संकल्पाचे फल ईश्वरकृपेने निश्चित मिळते. अशीच उत्तरोत्तर ईश सेवा आपणाकडून घडत राहून मनुष्य जन्माचे सार्थक व्हावे ही ईश्वरचरणी प्रार्थना.

❄ ❄ ❄

आपले सप्ताह पारायण सेवा श्रीप्रभूकृपेने चालू आहे. ईश कृपेनेच ती निर्विघ्न व्यवस्थित पार पडेल. चिंता नसावी. मध्ये मध्ये अशी सेवा प्रार्थना चालू असावी. दुरितक्षय होऊन कल्याण होईल.

❄ ❄ ❄

सर्वांचे आतिथ्य आपण करता ही पारमार्थिक वृत्ती उत्तम आहे. ईश्वरकृपा आहे.

❄ ❄ ❄

श्रीगुरुचरित्र सप्ताह सुरु झाले आहे. सात सप्ताह करणेचा संकल्प आहे हे समजून संतोष झाला. श्रीदत्तप्रभूंच्याकृपेने आपला हा पुण्यकर्माचा संकल्प, निर्विघ्न व्यवस्थित पार पडेल. काळजीचे कारण नाही. संध्याकाळी

पोहे, दूध घेणेस हरकत नाही. ईशकृपेने आपणांकडून सत्कर्म सेवारुपाने घडत आहे. पूर्व सुकृतही याला कारण आहे. आणि पुन: या पुण्यकर्माने त्याच भरच पडत आहे. ईश्वरकृपा आहे.

❄ ❄ ❄

चक्रव्यूहात आत जाण्याची व बाहेर येण्याचीही माहिती असली म्हणजे गोंधळ होत नाही. प्रपंच व्याप हा मोठा  चक्रव्यूहच आहे. त्यात सर्वांनाच जावे लागते. अशा वेळी सर्वांना योग्य मार्गदर्शक, पूर्ण शक्तिसंपन्न, परमात्माच सर्व संरक्षक आहे. या संत महात्म्यांच्या अनुभवावर विश्वास ठेऊन प्राप्त कर्तव्य चक्रव्यूहात राहूनच करावयाचे असते.

'हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा' ही प्रार्थना नित्य करीत राहून, अनुकूल प्रतिकूल परिस्थितीतून ईशकृपेने मोकळे व्हावयाचे असते. प्रतिवादी आज तडजोडीला तयार नाहीत. त्यांचे इच्छेप्रमाणे वागणे भाग आहे. हे परेच्छा प्रारब्धच आहे. सौ..... नीही यापुढेही सर्व अंतरंग संसाराकडे लक्ष देऊन मुलांना योग्य मार्गदर्शन करीत राहून आपणांस सहाय्य केले पाहिजे. **संसार देवाचा आहे या भावनेने सर्व साध्य होते.**

कोर्टाचे काम वैयक्तिक अथवा इतरांकरिता करणे हे आपले प्राप्त नित्य कर्मच आहे. ईशस्मरणपूर्वक ते केल्यास ते उत्तम कर्मभोगच आहे.

तूर्त निर्माण झालेली आपली चित्त व्यग्रता कांही अंशी कमी झाल्यावर दीक्षेचा विचार करावा. तो पर्यंत यथावसर ईश्वरनामस्मरण, संतांच्या ग्रंथांचे सवडीने वाचन, चिंतन चालू ठेवावे. यानेही पुष्कळ मार्गदर्शन मिळत राहून स्वास्थ लाभेल.

'घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते' हे पाच श्लोकांचे स्तोत्र प्रसिद्ध आहे. ते नित्योपासना क्रमांत छापले आहे. या स्तोत्राचे १०८ पाठ करण्याचे ठरवून, रोज सवडीप्रमाणे होईल तेवढे चालू करावेत. **ईशकृपेने संकट परिहार होईल.** सरकारी नोकरीत जाण्यापेक्षा घरीच राहून स्वतंत्र वकीली व्यवसाय, घरांत श्री

पिताजींचे मार्गदर्शन घेऊन त्यांनी सांभाळला तर याने राष्ट्रकार्य उत्तम करता येईल. गरीबांची सेवा घडून आशीर्वाद मिळेल. श्रीरामप्रभूंचे प्रेरणेप्रमाणे सर्व घडेल.

❄ ❄ ❄

संतांच्या ग्रंथांचे वाचन श्रद्धेने चालू ठेवल्यास त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे चित्तदोषांची व ते दूर करण्याच्या उपायांची जाणिव व आचरणही हळू हळू ईशकृपेने घडत राहून चित्ताला शांती प्राप्त होते. दोष गुण हे अनेक जन्म चालत आले आहेत. सर्व इंद्रिये, मन यावर ईश्वराचे स्वामित्व आहे. करीता त्याचीच प्रार्थना करीत राहून ईशभक्तीतच रंगून जाण्याचा प्रयत्न करीत राहाण्यानेचे चित्त दोष कमी होऊन गुणांची वृद्धी होणे शक्य आहे. कांही काळ दोषांचा जोर भासला तरी निराश न होता सर्व भार ईश्वरावर घालून त्याचे भजन करण्याकडेच अधिकाधिक लक्ष देत राहिले पाहिजे. हे कार्य अखंड, निर्विघ्नपणे चालू राहाण्याकरता नित्य तळमळीने ईश्वर प्रार्थना चालू ठेवली म्हणजे काळजीचे कारण रहाणार नाही. परमात्मा सर्वज्ञ, सर्व शक्तिसंपन्न दयासागर आहे त्याचे कृपेनेच सर्व कार्यसिद्धी होणारी आहे हा विश्वास बाळगून निश्चिंत राहावे.

❄ ❄ ❄

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम. आपण देऊन गेलेले पत्रद्वय व भागवतातील सार वाचून संतोष झाला. मागील श्री.... यांच्या पत्रात आपणाविषयी काही विचार लिहिले त्याचा काही अनुवाद यातूनही होणे संभवनीय आहे.

आपले श्रवण, वाचन, हे चिंतनपर्यवसावी असते हे आपल्या भागवतसार लेखनावरुन स्पष्ट होते. श्रोत्रेंद्रिय व योग्य विचारशील स्थिर होणाऱ्या मनाचे हे कार्य म्हणता येईल.असे मन सत्वप्रधान बनलेले, ज्याच्यातील रज व तम, हे गुण कमी निष्प्रभ ठरलेले असतात असे असते. यालाच मनाची शुद्धी अथवा ईश्वरशक्तीची जागृती असे म्हणता येईल. शास्त्रदृष्टीने ही बहुत सुकृतांची जोडी आहे. असे मन, शास्त्र व संत महात्मे यांच्या संगतीने पुष्कळ काळाने अनेक जन्माने बनत आलेले असते. अशा मनातच, भगवंतांनी सांगितलेल्या

दैवी गुण संपत्तीच्या विविध अंगांचा विशेष उद्भव होत राहिल्यामुळे या मनाच्या स्वामी जीवाला भगवंतांनी विभूती असे म्हटले आहे. ईशशक्तीचा विशेष आविर्भाव, जागृती जेथे दिसते ती विभूती. आपल्या सुकृत संपत्तीमुळे आपल्या मनाची स्तब्धता-सत्वप्रधानता व्यक्त झाल्याने आंतला आवाज कार्य करतो असे आपणास वाटले. शरीरामध्ये जीवात्म्याप्रमाणे, दुसरी अंतर्यामी (ईश्वरजा) ईशशक्ती आहे. ती सर्व शरीरामध्ये असते. तिच्या अस्तित्वानेच त्रिगुणात्मक मनाला प्रेरणा होत असते. 'अपाणिपादोजवतोग्रहीता, पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः' असे ईश शक्तीचे वर्णन आहे. म्हणजे ईशशक्तीला, जीवात्म्याप्रमाणे ज्ञानकर्म-साधनांची अपेक्षा नाही. यामुळेच परमात्म्याला हृषीकेश-हृषीकांचा – इंद्रियांचा स्वामी असे सार्थ नांव आहे. 'करणे कां न करणे। हे आवघे तोचि जाणे। विश्वचळतसे जेणे। परमात्मेनी' ही ओवी श्रीज्ञानराजांची सर्वज्ञ सर्वशक्तीपूर्ण परमात्म स्वरुपाचा प्रकाश करणारी, दैवी प्रकृतीच्या मनाला धक्का देऊन स्तब्ध करणारी 'एक तरी ओवी अनुभवावी' यापैकी असावी असे वाटते. अशा ईशशक्तीचा मनामध्ये अविर्भाव, जागृती, अनेक सात्विक रुपाने मनामध्ये होऊन राहिली असता, ते मन किंवा त्याचा स्वामी जीवात्मा, शेवटी अनेक जन्मांनी स्थितप्रज्ञ ईश्वररुपच होऊन रहातो.

'बहूनां जन्मानामन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते।

वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभ :'

असे भगवान् सांगतात. श्रीज्ञानराजही, या पूर्णतेस पोचलेल्या महात्म्याचे वर्णन 'किं बहुना दिवस रात्री। पुढिलांचे सुख उन्नति। आणीत आणीत स्वार्थी प्रवेशिजे' या ओवीत करीत आहेत. प्रपंचात राहूनही आपला पारमार्थिक प्रवास, वरील प्रमाणे उत्तम चालू आहे असे कोणाही विवेकसंपन्न मनाला दिसून येईल. या प्रमाणे ईशशक्तीच्या जागृतीमुळे, आपले मन अहंकाराच्या पलीकडे जाऊन 'जै जग धाकुटे होईजे। तैद्र जवळीक माझी' या श्रीमाऊलीच्या सांगण्याप्रमाणें ईश्वराची जवळीक साधून राहिले आहे असे दिसून येते. 'परगुण परमाणुन

पर्वतीकृत्य नित्यम्' ही मनोवृत्ती शक्ती जागृतीचेच स्वरुप असल्याचा महात्म्यांचा अनुभव आहे. सर्वांना यथोचित नमस्कार व आशिर्वाद. कळावे. सज्जन कृपाभिलाषि.

❄ ❄ ❄

ईश्वरप्रार्थनापूर्वक साधनाभ्यास नित्य चालू ठेवणेचा प्रयत्न करणे हितावह आहे. मध्ये मध्ये प्रारब्धाने विघ्न येण्याचा, खंड पडण्याचा संभव आहे. तथापि ईश्वरप्रार्थना तळमळीनें घडल्यास विघ्न परिहार ईशकृपेनें घडून साधनाभ्यास समाधानकारक होऊ लागतो. रोज रात्री निजण्यास आपणांस बराच वेळ लागतो. या मुळे झोप पुरी होत नाही.

याचा परिणाम दिवसभर अस्वस्थता रहाते. यात काही बदल झाला पाहिजे. १० ते ५ झोप पूर्ण होऊन सकाळी बैठकही होऊ शकेल. दहापूर्वी जेवणे सर्वांची उरकल्यास आपल्या मंडळींचीही झोप पूर्ण होऊन साधना घडेल. प्रयत्न करावा.

❄ ❄ ❄

परमात्मा पूर्ण शक्तिसंपन्न असून दयासागर आहे. त्याचेजवळच रोज प्रार्थना करुन न्यूनाधिक सर्व निवेदन करीत असावे. त्याचे कृपेने इष्टसिद्धी निश्चित होईल.

❄ ❄ ❄

श्रद्धेने साधना, नामस्मरण, सद् ग्रंथवाचन इत्यादि चालू ठेवावे याने शांती लाभेल. श्रीगरुडेश्वर, तिरुपती, गाणगापूर इत्यादि तीर्थयात्रेस आपण अवश्य जाऊन यावे. यानेही पापक्षय होऊन समाधान लाभते.

❄ ❄ ❄

रोज साधनाभ्यास चालू ठेवावा. श्रीमहाराजांची प्रार्थना करावी.

कोणतीही विद्या, कला यांचा उपयोग जीवनामध्ये पोषक ठरतो. इतर वेळी साधनाभ्यास चालू ठेवावा.

❄ ❄ ❄

ईशस्मरणपूर्वक साधनाभ्यास चालू असावा.

❄ ❄ ❄

श्रीमहाराजांचा नित्य येथे निवास आहे अशी आमची भावना अनुभवाने आहे. आपलीही असावी.

❄ ❄ ❄

प्रतिवार्षिक नवरात्र अवश्य केले पाहिजे. एखाद्या वेळी अडचण आली तरी नेहमी तशी परिस्थिती नसते.

साधनाभ्यास नियमितपणे चालू ठेवावा. मनोविकार हळू हळू कमी होतील. प्रभूची प्रार्थना चालू ठेवावी. नित्य उपासनाक्रम पुस्तकात श्रीमहाराजांची करुणात्रिपदी आहे. ती उत्तम प्रार्थना आहे. ती रोज रात्री शांतचित्ताने सर्वांनी म्हणावी. याने पूर्ण शांतीचा लाभ प्रभू कृपेने होईल.

❄ ❄ ❄

कोणतेही अनुष्ठान दीर्घकाल, निरंतर, श्रद्धापूर्वक केले म्हणजे त्याचा गुण निश्चित येतो. व्यवहारातही प्रमोशनकरिता वाट पहावीच लागते. ईश्वर दयाळू, सर्वज्ञ, पूर्ण शक्तिसंपन्न आहे. त्याच्याच कर्तृत्वावर भार टाकून यथाशक्ति सेवा करीत राहाणे एवढेच साधकाचे काम आहे.

❄ ❄ ❄

... तेथे ईश कृपेने सर्व व्यवस्था होईल. काया, वाचा, मन व धन या साधनांनी जेवढी सेवा होईल तेवढी करावी.... आपण निर्धाराने निघाल्यावर देव सर्व व्यवस्था करतात.

(हे पत्र कुरवपुरच्या संदर्भात आहे)

❄ ❄ ❄

शुभेच्छा ही ज्ञानाची पहिली भूमिका आहे. ती ईशकृपेने आपणा सर्वांस लाभली आहे. ईशस्मरणपूर्वक हळू हळू मार्गक्रमण करीत पुढे जावयाचे आहे. ते पूर्णतेस पोचण्याकरिता नित्य ईशप्रार्थना तळमळीने करीत राहिले पाहिजे.

❄ ❄ ❄

आपणास पितृसेवा घडत आहे हे योग्य आहे. सत्पुत्राचे कर्तव्य आहे. त्यातून अवसर मिळाल्यास आपला नित्यधर्मही चालू ठेवण्यास हरकत नाही. आपद्धर्माचे पालन यथाशक्ति करतात. 'श्रीपाद श्रीवल्लभ त्वं सदैव' या स्तोत्राचे पठण प्रारब्धक्षय करण्यास समर्थ आहे. ते नित्य चालू ठेवावे. प्रभूची प्रार्थना, नामस्मरण यथावसर करावे. चित्तास शांती मिळेल.

❄ ❄ ❄

**संसारात / व्यवहारात समाधानी असणे चांगले पण परमार्थात शेवटपर्यंत असमाधान असावे.** दीपकाला नाही का वाटले कि आपण करतोय ती गुरुंची सेवा कमीच आहे. मनाची एकाग्रता साधण्यासाठी साधनेव्यतिरिक्तही ध्यानाचा अभ्यास चालू ठेवावा. **आपल्या मनाची जास्तीत जास्त स्थिरता साधणे महत्वाचे आहे.**

❄ ❄ ❄

आत्मानात्म विचार / आत्म चिंतनाचा अभ्यास वाढवावा.

❄ ❄ ❄

ज्यांना झोप कमी करणे शक्य नसेल त्यांनी आपले इतर व्याप कमी करुन जास्तीत जास्त तो वेळ साधनेला द्यावा.

❄ ❄ ❄

औषध किती दिवस घ्यायचे हे आपण कोण ठरविणार. डॉ. सांगेपर्यंत घेत राहायचे. तसे साधनेचे आहे.

❄ ❄ ❄

नवीन क्रियमाण कर्म घडू न देण्याची आपण जास्तीत जास्त काळजी घ्यावी.

❄ ❄ ❄

**बैठकीला बसल्यावर निर्विचार मन करुन तटस्थपणे काय होते ते पहात बसणे एवढेच अपेक्षित आहे** पण ध्यानाचे तसे नाही. तिथे प्रयत्न हवा. आत्यंतिक तळमळ हवी. **सद्‌गुरुकृपा असेल तर बैठकीत आत्मानात्म विचार आपोआप येतात पण तसे न झाल्यास आपण आठवून तो तत्वविचार करण्यास हरकत नाही.**

❄ ❄ ❄

प्रयत्न करीत राहीले पाहिजे. विचारापेक्षा आचार प्रधान आहे. विचारांचे पर्यवसान आचारात झाले पाहिजे तरच त्याचे साफल्य आहे. ईश्वरसुद्धा योग्य आचार ठेवणाऱ्याला फल देणारा आहे. असे नसेल तर त्याला हुकूमशहा म्हणतील. ईश्वराचेच सर्व कर्तृत्व आहे असा सिद्धांत अर्जुनाला सांगितला गेला. तो कर्म सोडण्याकरता नसून ईश्वरशक्तिवर पूर्ण विश्वास ठेवून निरहंकार बनून कर्म करीत राहाणे. यात आपण निमित्तमात्र आहोत अशी वृत्ती बाळगून कर्म करण्याकरिताच आहे. यात निराशाही नाही आणि अहंकारामुळे अति उत्साहही नाही. चित्ताची समता व निर्विकारताच आहे. स्वत:चेच विचाराधिक्य असण्यापेक्षा संतांचेच विचार उत्साह वर्धक मार्गदर्शन करणारे व निराशा दूर करणारे ठरतील असे वाटते.

सन्मती व असन्मती दोनच प्रकार बुद्धीचे होतील. जी बुद्धी महात्म्यांच्या चरित्र आदर्शामुळे, त्याच प्रमाणे व्यक्तिगत लाभाचा विशेष विचार न करता, आर्तजनांची आर्ती दूर करण्याचा प्रयत्न करते ती सन्मती समजावी. हीच पूर्व सुकृतानुसार ईश्वरदत्त ठरते आणि जी स्वत:चा व्यक्तिगत लाभ (आर्थिक), यश इ. स्वार्थाकडेच लक्ष देऊन स्वत:चा मानलेला मोठेपणा मानणाऱ्याच्याच उपयोगी पडणारी ती असन्मती ठरेल हीच केवळ कर्मानुसारिणी आहे. पण हे देखिल आपल्या पदरात टाकलेले दक्ष ईश्वरप्रदत्तच स्वकर्माचेच फल आहे. इ. विचार करावा.

एखाद्या योग्य कर्माकरता प्रयत्न करु इच्छिणारी बुद्धी स्वत:च्या पारमार्थिक कल्याणा करिता आहे का लोकांच्या बरे वाईट म्हणण्यावर अवलंबून आहे हा ही विचार ईश्वर-प्रार्थनापूर्वक केला तर समाधान होऊ शकेल.... आणखी केव्हां तरी विचार करता येईल.

❈ ❈ ❈

ईशचरित्रे, संत चरित्रे वाचून सवडीप्रमाणे चिंतन करावे यानेही दुरितक्षय होऊन जाऊन चित्तशांती लाभेल.

❈ ❈ ❈

कु. .... ताईंस मंगल आशीर्वाद. वि. क्षे. तुमचे पत्र मिळाले. परीक्षा दोघींनीही पास झाल्याचे वाचून आनंद झाला. तुमच्यासारखे मोठे मोठे अक्षर आम्हाला लिहिता येत नाही. लहान मुलांचे मन मोठे असते कारण ते निर्मल असते, शुद्ध असते. ध्रुव, प्रल्हाद, मीराबाई यांचे बरोबर देव बोलत होते. त्यांना सर्व संकटकाळात सांभाळीत होते याचे कारण त्यांचे मन शुद्ध, निर्मल, मोठे होते. म्हणून ते महात्मे होते. या करिता दिगंबराचे भजन करणे, तो मंत्र वहीत लिहिणे हे रोज तुम्ही करता ही देवाची तुमच्यावर कृपा आहे म्हणून मोठ्या माणसांनी लहान होण्याची इच्छा करावी. 'लहानपण देगा देवा मुंगी साखरेचा रवा' असे श्रीतुकाराम महाराजांनी लहानपणच देवाजवळ मागितले आहे. आपले मोठेपण विसरुन देवाचे भजन करणे, त्याला कधीही न विसरणे हे खरे लहानपण आहे. तुम्हाला हे सर्व शिकवणारे मातापिता देवाने दिले आहेत. त्यांचे आज्ञेप्रमाणे वागून, देवाची आठवण नित्य ठेवून खरे मोठेपण तुम्हाला मिळावे अशी आम्ही देवाजवळ प्रार्थना करतो.

❈ ❈ ❈

श्रीज्ञानराजही 'देव द्विजगुरौ प्राज्ञपूजनम्.... शारीरम् तप उच्यते.' या श्लोकातील गुरु शब्दाची व्याख्या करताना सांगतात

'सकळ तीर्थाजीचे धुरे। जिये का मातापितरे। तया सेवेसी कीर शरीरे। लोण कीजे'

या तपामुळेच पुंडलीकाचे भेटी परब्रह्म आले गा असे श्रीनामदेवरायही सांगतात. इकडे लक्ष ठेवून कृतज्ञता व संयम साधावा हीच जाणुनी करावी चित्तशुद्धी. खरी चित्तशुद्धी होऊ शकेल.

❄ ❄ ❄

... निश्चिंत मनाने नामस्मरण, ग्रंथवाचन सवडीने चालू ठेवून चित्त शांती मिळवावी. ईश्वर सर्वत्र आहे तरीही चित्तदोष पूर्णपणे जाऊन ते स्थिर झाल्याशिवाय प्रत्यक्ष दर्शन घडत नाही. तो पर्यंत श्रद्धेने चिंतन करीत राहावे लागते. त्यातही ईश्वरकृपेने समाधान मिळते. गोपींना ११ वर्षे श्रीकृष्ण संगती लाभली पुढे त्यांनी नित्य स्मरण ठेवूनच प्रपंचही ईश्वरआज्ञा म्हणून केला. ईश्वर दिसत नाही दूर आहे असे वाटणेही श्रद्धा भक्ती दृढ करणारे आहे. सान्निध्य सर्वांना लाभदायक ठरत नाही. कोणत्याही उपायाने चित्तदोष गेले म्हणजे झाले. श्रीकृष्ण चरित्र वाचन आपले चालू आहेच त्यानेच हा सर्व खुलासा होईल.

❄ ❄ ❄

आपली दोनही सविस्तर पत्रे मिळाली. प्रकृती व काही प्रवास यामुळे उत्तर पाठविण्यास वेळ लागतो. नाईलाज आहे.

आध्यात्मिक उन्नती व्हावी असे आपणास वाटते ते अयोग्य नाही. तथापि त्याबद्दल पूर्ण विचार करुनच योग्य तो निश्चय करणे हितावह ठरेल. हितैषी सर्व वडिल मंडळींबरोबर आपल्या ध्येयाबद्दल विचार झाला पाहिजे. निश्चय कदाचित झाला तरी किती टिकणारा आहे याची ही वाट पाहिली पाहिजे. कलियुगात संन्यासाश्रम वर्ज्य म्हणून सांगितला आहे. याचे कारण त्या करिता लागणारे अत्युच्च वैराग्य याची प्रथम जरुरी आहे. संन्यास न घेताही राम, कृष्ण, एकनाथ, तुकाराम, नामदेव इत्यादि महात्म्यांनी स्वपरकल्याण

साधले आहे. देहाची आसक्ती पूर्ण कमी झाल्यावाचून संन्यासी होऊन राहाणे फार कठिण आहे.

मूलं तरो: केवलमाश्रयन्त: पाणिव्दये भोक्तुममत्रयन्द: ।

कन्यामपि स्त्रीमिव कत्सयन्त: कौपीनवन्त: खलु भाग्यवन्त: ।।२।।

(कौपीनपंचकं स्तोत्रम्)

असे संन्याशाचे महत्व श्रीशंकराचार्यांनी वर्णन केलेले आहे. पण त्यातच पूर्ण निरपेक्ष वृत्ती झाल्याशिवाय ते कठिण असल्याचेहि दर्शविले आहे. केवळ झाडाखाली राहाण्याची तयारी मनापासून पाहिजे. दोन हात एवढेच जेवणाचे साधन म्हणजे कोणताही संग्रह न करता करपात्री बनले पाहिजे. अंतर्बाह्य संपत्तीबद्दलची अभिलाषा पूर्ण दूर होऊन ती तुच्छ वाटली पाहिजे. अशी तयारी असल्याशिवाय संन्यासाचरण योग्य होत नाही. त्या करिता कोणत्याही आश्रमाची गरज नाही.

हा सर्व विचार करुन तूर्त हे विचार थांबवून प्रथज्ञ अंगीकृत शिक्षण पूर्ण करण्याचा निश्चय करुन अभ्यासात पूर्ण लक्ष देणेच योग्य ठरेल. मातापितरांची तशी इच्छा असणे तुमच्या कल्याणाकरिताच आहे. श्री ज्ञानेश्वर, श्री एकनाथ, श्री रामदास इत्यादि संतांचे ग्रंथ पूर्ण जिज्ञासेने वाचले पाहिजेत. त्यांचे चांगले मनन झाले पाहिजे तरच योग्य ते होणारा निश्चय फलपर्यवसायी ठरणे शक्य आहे.

'अनाश्रित: कर्मफलं कार्यं कर्म करोति य:

स संन्यासीच योगीच न निराग्निर्नचा क्रिय:'

या गीता श्लोकाकरिता ज्ञानेश्वरी इत्यादि ग्रंथातील विचार अभ्यासावेत. बम्हचर्याश्रम विद्यार्जनाकरिता आहे. संन्यासाश्रम पूर्ण निरपेक्ष वृत्तीचा आदर्श बनविण्याकरिता आहे.

श्री रामकृष्ण परमहंसाची देवी भक्ती अत्यंत उच्च कोटीची असल्याने देवीच्या कृपेने ते गृहस्थाश्रम स्वीकारुनही पूर्ण विरक्त संन्यासी राहू शकले.

आत्मनिरिक्षण पूर्ण करुन, आपल्या मनांतील कामक्रोधादि विकार किती प्रमाणात आहेत हे पूर्ण तपासून पाहिल्यानंतरच संन्यासाचा विचार केले पाहिजे. ही निर्विकारता ईश्वर भक्तिनेच साध्य होणारी आहे. आश्रम गौण आहे. कोणत्याही आश्रमात जाऊन भगवी वस्त्रे घेतली म्हणजे संन्यास म्हणत नाहीत. तेथेही आत्मानात्म विचार अहोरात्र करुन, ईश्वरभक्तिनेच निर्वासन मन बनविले पाहिजे. मग तशीच भक्ति व प्रयत्न, प्राप्त कर्तव्य करीत राहून करता येणार नाहीत काय? गृहस्थाश्रमी माणसावर देवाची कृपा होत नाही काय? त्यातही संन्यासाश्रमाप्रमाणे त्यागी आदर्श सांपडणार नाही काय? इत्यादि सर्व विचार हितैषी, घरातील, बाहेरील सर्वांशी करुन निर्णय घ्यावा.

सहसा विदधीतक्रियाम । अविवेकः परमा पदां पदं

❄ ❄ ❄

आज आपली २४० रु. ची मनी ऑर्डर मिळाली. लगेच मनी ऑर्डर करण्याचे कारण नव्हते. पुढच्या महिन्यात तुमचा पगार झाल्यावर हळू हळू आम्हाला मिळाले असते. मनी ऑर्डरचे कमीशन बरेच पडले असेल आणि तुम्ही हे पैसे पाठविताना तुमचे पिताजी, ....... यांचेशी विचार केला होता काय? कारण ज्या डब्यात आमचे पैसे ठेवले होते त्यातच तुम्हीही आम्ही दिलेले पैसे ठेवले असणार. त्या डब्यातील आम्ही निघेपर्यंत जमलेल्या सर्व पैशाची मोजदाद करुन आम्हाला ड्राफ्ट दिला गेला आहे हे तुम्हालाही विहीत आहेच. मग हे तुम्ही पाठविलेले पैसे आमच्या हिशोबापैकी नसावेत असे वाटून तुमच्याकडून आलेले पैसे स्वतंत्र ठेवले आहेत. तुमच्याकडून खुलासेवार पत्र येऊन आमच्या मनाची खात्री पटल्यावरच ते आमचे स्वामित्वाचे समजले जातील. तो पर्यंत त्यावर तुमचे स्वामित्व आहे अशी आमची धारणा आहे.

आता पुढील तुमचे जीवन स्वतंत्रपणे सुरु होत आहे. नोकरी लागून द्रव्यही स्वतंत्रपणे तुम्हास मिळू लागेल. अशा वेळी यौवन, धन व स्वातंत्र्य या तीन गोष्टी एकत्र जमल्यामुळे विवेकाने, संयमाने, वडिल मंडळींच्या विचारांनेच वागण्याचे प्रथमपासूनच तुम्ही ठरवून तसे वागत राहिल्यास तुमचे व तुमच्या

परिवाराचे जीवन सुखी होणार आहे. पैसा हातात आल्यावर मित्रही तसेच नोकरीवर असणारे भेटणार. त्यांच्याबरोबर तुम्हालाही पैसा भीडेने खर्च करावा लागणार. त्या वेळी तो खर्च योग्य का अयोग्य हा विचार समुदायामध्ये केला जाणार नाही. त्यामुळे अशांती निर्माण होण्याचा संभव आहे. तुमच्या पिताजींच्या वर अगदी लहानपणीच प्रपंचाचा भार एकदम पडला. पण त्यांनी ....... वगैरे वडिल मंडळींच्या विचारांनी वागून धर्म, सच्छील, निर्व्यसनत्व, ईश्वरनिष्ठा इ. गुणांची वाढ करीत राहून आजपर्यंत पूर्वीचा घराण्याचा नांव लौकिक कायम राखून प्रपंच उत्तम प्रकारे चालविला आहे. तुमचे शिक्षण पूर्ण केले. दोन मुलींची लग्ने केली. येणाऱ्या जाणाऱ्यांना चहापाणी भोजन इ. सहाय्यही कर्तव्य बुद्धीने त्यांच्याकडून होत आहे. हे सर्व लक्षात आणून त्यांना सर्वतो परी सहाय्य करण्याचा निश्चय प्रथम तुम्ही केला पाहिजे. सुपारीच्या खांडाचेसुद्धा व्यसन लागणार नाही अशीच मित्रसंगती निवडून प्राप्त कर्तव्यात दक्षतेने रमून जाऊन उन्नती करुन घेणे तुमचे हाती आहे. या करिता एक व्यवहारिक सूचना करावीशी वाटते. ती योग्य असल्यास स्वीकारावी.

ती अशी .... मुख्यत: द्रव्याचा संबंध अधिक नसावा या हेतुने तुमचे व श्री ....... दोघांचे नांवे बँकेत एक खाते उघडावे. दोघांच्याही सहीशिवाय पैसे मिळणार नाहीत अशी व्यवस्था प्रथमच करुन ठेवावी. तुम्हाला भोजन व किरकोळ खर्चास महिना किती पैसे लागतील हे ठरवून तेवढी रक्कम पगार येताच काढून घेऊन बाकीचे पगाराचे सर्व पैसे दोघांच्या जॉंईट खात्यात पगार आलेल्या दिवशीच जमा करुन ती पावती ....... येथे पाठवून द्यावी. तसेच दुसरा नियम म्हणजे कोणाकडूनही केव्हांही उसने पैसे घ्यायचे नाहीत. हा सांभाळावा म्हणजे आपणासही दुसऱ्यास द्यावे लागणार नाही. यांस अपवाद एखाद्या धार्मिक, सामाजिक कार्याकरिता सर्वाबरोबर आपणही यथाशक्ति मदत करण्यास हरकत नाही.

सारांश सर्व लक्ष भोगाकडेच दिले जाऊ नये. हे पथ्य पहावे. तुमच्या बहिणीच्या विवाहाचा खर्च बराच करावा लागणार. या करिता लागणाऱ्या तुमच्या दोघांच्या जॉइंट खात्यातून योग्य ती रक्कम काढून घेऊन ती विवाहाप्रित्यर्थ

खर्च करण्यास तुमची अनुमती असावी. लोकांचे कर्ज काढल्यास हफ्ते द्यावे लागल्यास त्याचे हफ्ते जसे द्यावे लागतात म्हणजे कर्जाची फेड लवकर होऊन व्याजही फार भरावे लागत नाही. त्या प्रमाणे तुमचे पिताजीही हातात येतील तसे पैसे तुमच्या जॉइंट खात्यात वेळो वेळी भरत राहातील. म्हणजे त्या खात्यातील रक्कम पूर्वीप्रमाणे स्थिर राहून प्रापंचिक कार्यही व्यवस्थित पार पडतील.

तात्पर्य ... एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ

असे वागून जीवन यशस्वी, सुखी करावे. एखादी योग्य, कुलीन सर्वांना सांभाळून घेणारी वधू आल्यास लग्न करुन घेण्यास हरकत नाही. ते सर्व तुमचे कार्य ईश कृपेने घडून येईल. अभक्ष भक्षण, अपेय पान, चित्रपट दर्शनाचा अतिरेक या पासून सावध राहावे.

ईश्वर तुमचे कल्याण करो

कळावे हे आशीर्वाद. घरी सर्वांना मंगल आशीर्वाद.

❄ ❄ ❄

Graphic Printers Borivali (W) : 9322 840 846 / 2899 92 39 / 2899 93 30